सेव्हींग व करंट
खात्यांवर मिळवा
7% व्याजदर
दि जैन मर्चन्टस् को-ऑप.
क्रेडीट सोसायटी लि.
श्री. संजय काटेड (संस्थापक)
Mo. 9372444001
इमारत कंपनी, पोस्ट ऑफिस जवळ,
कापड बाजार, अ.नगर.
फोन नं. : 0241-2993900

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

सुवर्ण विश्वातील सर्वात जूनी..
विश्वसनीय व नामांकित पेढी...
HB
Since 1935
मे. हरी बाळाजी देडगांवकर
सराफ अँण्ड ज्वेलर्स
२५७१, एम.जी.रोड, कापड बाजार, अहमदनगर.
फोन : २३४६४४३. मो. ९८२२९९१०२४.

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ३१.१०.२०२६ | अंक नं. १८० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

# आधारवड

## शब्द अपुरे... दुःख अथांग !

# स्व. भानुदास एकनाथ कोतकर

स्व. शनिवार, दि. २४/१०/२०२६

## आपल्या पावन स्मृतीस

## विनम्र अभिवादन!

## ॥ दशक्रिया विधी ॥

सोमवार, दि. ०२.११.२०२६ रोजी सकाळी ०८.०० वा.

**स्थळ :** कोतकर मळा, एकनाथ नगर, केडगाव (देवी), अहिल्यानगर

-: दुःखांकित :-

गं.भा.सुरेखा भानुदास कोतकर (पत्नी)

श्री. बाळासाहेब एकनाथ कोतकर (भाऊ)
श्री. संदीप भानुदास कोतकर (मुलगा)
श्री. सचिन भानुदास कोतकर (मुलगा)
श्री. महादेव एकनाथ कोतकर (भाऊ)
सौ. चंद्रकला देविदास अकोलकर (बहीण)
सौ. सुवर्णा सचिन जगताप (मुलगी)

श्री. अमोल भानुदास कोतकर (मुलगा)

## समस्त कोतकर परिवार

टीप : ह. भ. प. शंकर महाराज शेवाळे यांचे सकाळी ८ वा. प्रवचन होईल.

SVA/9850514775

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. ३१.१०.२०२६ | अंक नं. १८० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



**दिवाळी महासेल.. स्टॉक असेपर्यंत...**

महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस,ब्लाऊज भारी, टॉप, लोवर — रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३

लेडीज : स्मॉल ते XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस — रु.२५०/-

टू पीस 3 X L ते 6 x L — रु.३००/-

- ब्रॅण्डेड लेडीज २ पीस थ्री पीस रु.१००० पासून पुढे
- जेन्टसचे ब्रॅण्डेड शर्ट, टी-शर्ट 6XL पर्यंत तसेच फॉर्मल पॅण्ट व जीन्स ४४ साईजपर्यंत व जम्बो बेडशीट उपलब्ध.
- लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
- लहान व मोठ्या मुलींचे भारी कपडे रु.३०० पासून पुढे
- बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-

वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत

अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल **मयुरी लेडिज मॉल**

मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

भावपूर्ण श्रद्धांजली

सहवास नसला तरी
स्मृती सुगंध देत राहील..
जीवनाच्या प्रत्येक वळणावर
आई तुझी आठवण येत राहील..

## कै. श्रीमती विमलाबाई बबनराव सग्गम

प्रथम स्मृतिदिनानिमित्त
पवित्र स्मृतीस

**विनम्र अभिवादन!**

-: दुःखांकित :-
संतोष बबनराव सग्गम, सागर बबनराव सग्गम
व समस्त सग्गम परिवार,
अहिल्यानगर


ना नफा ना तोटा पहिली तीन वर्ष.. कृपया त्याचा फायदा घ्या
कृपया जवळच्या किराणा ड्रायफ्रुट दुकानदारांना संपर्क करा

**रत्नकमल चहा**

दिवाळी धमाका पॅकेटमध्ये कुकर, दहा किलो पिशवी, आरती संग्रह, पाऊच यांचे रँडमली कुपन

इतर कंपन्यांपेक्षा ५० ते ७० रुपये कमी किलो मागे स्वस्त दर्जा त्यापेक्षाही उत्तम..

ब्रँडेड कंपनीचा चहा व
**रत्नकमल चहा**
एक वेळेस जरुर तुलना करुन पहा

आशिष ट्रेडर्स — चहा पावडरचे होल व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरूड गल्ली, मारूती मंदिरासमोर, अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367





15 वा वर्धापनदिन
१ नोव्हेंबर

आपण दिलेल्या प्रेम..सहकार्य यावरच
आज आम्ही 15 वा वर्धापनदिन साजरा करीत आहोत.

पुरूषांचे परिपूर्ण वस्त्र दालन..
**RC lifestyle**
creating fashion statement
FORMAL | CASUAL | PARTYWEAR | ETHNICWEAR | ACCESSORIES
2436, एम.जी.रोड, तेलीखुंट, अहमदनगर. फोन : ०२४१-२३५५०१८
Visit us at : www.rclifestyle.in


## काही मैत्रीचे बंध असे असतात,
### जे सोबत नसतानाही खूप काही सांगून जातात.

## स्व.भानुदासजी कोतकर
## भावपूर्ण श्रद्धांजली

दशक्रिया विधी

सोमवार दि.०२/११/२०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता
स्थळ : कोतकर मळा, एकनाथ नगर, केडगाव (देवी),अहिल्यानगर

: दुःखांकित :
**रामचंद्र गेणूजी दिघे**


Hero

हिरोसोबत
**सण आहे सगळीकडे...**
**Herotsav**
1st - 4th Nov, 2026
हिरो जिंकण्याची संधी मिळवा
दररोज दुचाकी.

एक्स-शोरूम किंमत
₹66 030* पासून सुरु
HF-Deluxe

मर्यादित कालावधीची ऑफर

| कॅश डिस्काउंट | त्वरित सवलत | वित्तपुरवठा | एक्सक्लुझिव्ह कॉर्पोरेट ऑफर्स |
|---|---|---|---|
| ₹2 100* पर्यंत | ₹10 000* पर्यंत | 100%* पर्यंत | ₹2 200* पर्यंत |

Hero GoodLife — TOLL FREE 1800 266 0018

**Authorised Dealers:**
Ahilyanagar : Ilakshi Hero 9289922398, Saideep Hero 9289922485;

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# गजबजलेल्या रस्त्यावरुन महिलेचे मंगळसूत्र दुचाकीस्वारांनी पळविले

नगर – केडगाव येथील गजबजलेल्या लिंक रोड परिसरातील अयोध्यानगर येथे ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेले.

रूपाली घुले व त्यांच्या आई मंगल घोळवे या दोघी लिंक रोडवरील भाजी मार्केटमधून पायी आपल्या घरी जात होत्या. सायंकाळी साडेसहा ते सातच्या सुमारास त्या घरासमोर पोहोचताच, मागून पाळत ठेवून आलेल्या दुचाकीस्वार चोरट्यांनी त्यांना गाठले. दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने रूपाली घुले यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र हिसका देत लंपास केले.

या घटनेनंतर दोन्ही मायलेकी घाबरल्या. काही काळ त्यांना नेमके काय घडले, हेही समजत नव्हते. परिसरातील नागरिकांनी पोलिसांना १०० क्रमांकावर घटनेची माहिती दिली. त्यानंतर कोतवाली पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून चोरट्यांचा शोध सुरू केला. दिवसाढवळ्या तसेच सायंकाळच्या वेळी महिलांच्या गळ्यातील दागिने हिसकावण्याचे प्रकार वाढत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेबाबतही नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

केडगाव परिसरातील वाढत्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, तसेच लिंक रोड व अयोध्यानगर परिसरात नियमित पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी स्थानिक नागरिक व रहिवाशांकडून होत आहे.

## रमेशसिंह परदेशी यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर – सबजेल चौकातील रहिवासी रमेशसिंह नारायणसिंह परदेशी (वय ७५) यांचे ३१ ऑक्टोबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अमोल व महेश परदेशी यांचे ते वडील होत.

## प्रभाकर खिंदारे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – गजानन कॉलनी, नवनागापूर येथील रहिवासी प्रभाकर सखाराम खिंदारे (वय ८३) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. उमेश, मुकेश खिंदारे यांचे ते वडील होत.

## नरसुबाई मडूर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – सावेडी येथील रहिवासी श्रीमती नरसुबाई विठ्ठल मडूर (वय ९१) यांचे ३० ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या मागे २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शरद व चंद्रकांत मडूर यांच्या त्या मातोश्री होत.

## कृष्णाबाई देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – अजनुज येथील रहिवासी कृष्णाबाई दिनकर देशमुख

(वय ९२) यांचे ३० ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर ३१ ऑक्टोबर रोजी अजनुज येथे भिमानदी तिरी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. आनंदवाडी व मुंढेकरवाडी सोसायटीचे सचिव तानाजी देशमुख यांच्या त्या मातोश्री होत.

# किराणा गोडाऊनमधून चोरी

नगर – नगर तालुक्यातील निंबळक बायपास परिसरामध्ये एका किराणा मालाच्या गोडाऊनचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करत रोख रकमेसह किराणा माल चोरून नेल्याची घटना समोर आली आहेएमआयडीसी पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलीस चोरट्यांचा कसून शोध घेत आहेत.

याबाबत बापू मच्छिंद्र कोतकर (वय ४२, रा. निंबळक ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचे निंबळक बायपास येथे किराणा मालाचे गोडाऊन आहे.२९ ऑक्टोबर रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांपासून ते ३० ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजून ३० मिनिटांच्या दरम्यान हा प्रकार घडला. अज्ञात चोरट्याने गोडाऊनच्या दरवाजाचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश केला आणि चोरी केली.या चोरीमध्ये गोडाऊनमधून १ लाख ३६ हजार रुपयांची रोख रक्कम (ज्यात ५०० रुपयांच्या नोटांचा समावेश आहे) लांबवण्यात आली आहे. तसेच १० हजार रुपये किमतीचे १५ किलो बादाम, १२ हजार रुपये किमतीचे १५ किलो काजू चोरट्यांनी पळवले आहेत. याशिवाय २५ हजार रुपये किमतीचे १५ किलो वजनाचे १३ जेमिनी सोयाबीन तेलाचे डबे गोडाऊनमधून चोरीला गेले आहेत. ३० हजार रुपये किमतीचे, एका बॉक्समध्ये एक लिटरच्या एव्हरी टाईम कंपनीच्या १५ तेल पिशव्या असणारे तेलाचे १७ बॉक्स देखील लांबवण्यात आले आहेत.५ हजार रुपये किमतीचा एल.डी. कंपनीचा एल.ई.डी. टीव्ही असा एकूण ऐवज चोरट्यांनी लांबवला आहे.

फिर्यादी बापू मच्छिद्र कोतकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ), ३३१ (१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

## संभाजी चौधरी यांचे निधन

श्रीरामपूर – कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव येथील शेतकरी संभाजी (तात्या) रामकृष्ण चौधरी (वय ७२) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे व नातवंडे असा परिवार आहे. दिपक व संदिप चौधरी यांचे वडील तर अशोक सहकारी साखर कारखाना कामगार पतसंस्थेचे चेअरमन भाऊसाहेब दोंड यांचे ते मेहुणे होत.

विनम्र अभिवादन...
नगर जिल्ह्यातील चष्मा व्यवसायाचे जनक

कै. डॉ. नारायणराव आडकर
यांची ११० वी जयंती
आडकर
चष्म्यांचे तज्ज्ञ
• क्वालीफाईड ऑप्टोमेट्रीस्ट • शंभर व्या वर्षाकडे वाटचाल...
कापड बाजार कॉर्नर, अ.नगर
Eye Q Media

## घराचा कडी–कोयंडा तोडून दागिन्यांची चोरी

नगर – कल्याण रोडवरील ड्रीम सिटी परिसरातील एका बंद घराचा कडी–कोयंडा तोडून अज्ञात चोरट्यांनी कपाटातील सोन्या–चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण ६५ हजारांचा ऐवज लांबवल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत त्रिभुवन हिरामण लष्करे यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे श्रीगोंदा येथे नोकरीनिमित्त असून, त्यांचे कुटुंब ड्रीम सिटी येथील सी विंगमधील फ्लॅट नंबर ४०५ मध्ये राहते. दरम्यान, लष्करे यांच्या मुलीच्या नावावर असलेल्या फ्लॅट चा कडी–कोयंडा अज्ञात चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास तोडला. चोरट्यांनी घरातील साहित्याची उचकापाचक करत कपाटातील ११ हजार रुपयांची सोन्याची अंगठी, ४ हजारांची सोन्याची बाळी, १० हजारांचे कानातले झुबे, ३५ हजारांचे मिनी मंगळसूत्र, ५ हजारांचा सोन्याचा बदाम, ७ हजारांची सोन्याची अंगठी तसेच चांदीचे पट्टे व जोडवे असा ऐवज चोरून नेला. विशेष म्हणजे याच परिसरातील रमेश वाळेकर, प्रकाश सामलेटी आणि राहुल कोळेकर यांच्याही घराचे कुलूप व कडी तुटल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी पोलीस पुढील तपास करत आहेत.

मा.कै.भानुदासजी कोतकर साहेब,
मा.सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती,अहिल्यानगर
भावपूर्ण श्रद्धांजली

: दुःखांकित :
श्री. भाऊसाहेब नानासाहेब बोठे (सभापती) श्री. रभाजी मुक्ताजी सूळ (उपसभापती)
श्री. अभय भिसे (सचिव)
(संचालक मंडळ)
सौ. सुप्रियाताई अमोल कोतकर | सौ. मनिषा मंजाबापू घोरपडे
कु. आचल रामदास सोनवणे | श्री. हरिभाऊ लक्ष्मण कर्डिले
श्री. संतोष रामदास म्हस्के | श्री. संजय श्रीधर गिरवले
श्री. सुधीर विश्वासराव भापकर | श्री. दत्तात्रय लहाणु तापकीरे
श्री. भाऊ महादु भोर | श्री. मधुकर किसन मगर
श्री. राजु पांडुरंग आंबेकर | श्री. सुभाष भाऊ निमसे
श्री.धर्मनाथ आनंदा आव्हाड | श्री. भाऊसाहेब दादाबा ठोंबे
श्री. राजेंद्र झुंबरलाल बोथरा | श्री. निलेश अशोक सातपुते
कृषि उत्पन्न बाजार समिती, अहिल्यानगर.

सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील,
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची येत राहील.

आधारवड हरपला...
- शोकाकुल -
श्री.अंजाबापू बहिरु सातपुते | श्री.सचिन अंजाबापू सातपुते
श्री.गणेश अंजाबापू सातपुते | श्री.सागर अंजाबापू सातपुते
सातपुते डेअरी फार्म,सातपुते परिवार,समस्त ग्रामस्थ केडगांव (देवी).

# बुद्धिबळ खेळणारा चीनमधील रोबोट प्रथमच अहिल्यानगरमध्ये

## शांतीकुमारजी फिरोदिया मानांकन बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन

नगर – बुद्धिबळप्रेमींसाठी आकर्षण ठरणारी शांतीकुमारजी फिरोदिया अखिल भारतीय खुली आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा ११ नोव्हेंबर रोजी अहिल्यानगर येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, एस.टी. स्टँड रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेचे आकर्षण म्हणजे चीनमधून प्रथमच अहिल्यानगरमध्ये बुद्धिबळ खेळणारा अत्याधुनिक रोबोट येणार असून, हा रोबोट प्रत्यक्ष खेळाडूंशी बुद्धिबळाचा डाव खेळणार आहे. त्यामुळे बुद्धिबळप्रेमींसह नागरिकांनाही ही अनोखी संधी अनुभवता येणार असल्याची माहिती अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

स्पर्धेचे प्रमुख पंच म्हणून प्रवीण ठाकरे (जळगाव) काम पाहणार असून, पवन राठी (पुणे), शार्दुल टापसे (सातारा), दीपक चव्हाण (वाशिम), शिशिर इंदुरकर (नागपूर), प्रशांत धंगेकर आणि देवेंद्र ढोकळे (अहिल्यानगर) हे सहाय्यक पंच म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत. ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटना आणि अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या नियमावलीनुसार पार पडणार आहे. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशनने या स्पर्धेला प्रायोजकत्व दिले आहे.

स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सदस्य सुबोध ठोंबरे, परूनाथ ढोकळे, शाम कांबळे, मनीष जसवानी, प्रकाश गुजराती, चेतन कड, सचिन कांबळे (पाथर्डी), शिवा काळे (श्रीरामपूर), कु. दुर्गा ढोकळे (शेवगाव), संकेत गाडे (कोपरगाव), संजय खडके, नवनीत कोठारी, दत्ता घाडगे, अतुल कोठारी, शुभदा ठोंबरे, डॉ. स्मिता वाघ आणि रोहिणी आडकर आदी प्रयत्नशील आहेत. शहरातील बुद्धिबळप्रेमी, खेळाडू आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन यशवंत बापट व परूनाथ ढोकळे यांनी आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### देशभरातील खेळाडू होणार सहभागी

स्पर्धेत देशभरातील विविध राज्यांमधून खेळाडू सहभागी होणार असून, गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, तेलंगणा आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला प्रवेश निश्चित केला आहे, अशी माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. या स्पर्धेचे विशेष आकर्षण असलेला चीनमधून येणारा बुद्धिबळ यंत्रमानव खेळाडूंशी प्रत्यक्ष बुद्धिबळ खेळणार आहे. नगरमधील तसेच बाहेरगावच्या खेळाडूंना या रोबोटसोबत डाव खेळण्याची संधी मिळणार असून, बुद्धिबळ खेळाडू, पालक आणि प्रशिक्षकांसाठीही हा अनुभव विशेष ठरणार आहे, अशी माहिती संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी दिली.

### वयोगटातील मोठी विविधता हे स्पर्धेचे वैशिष्ट्य

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वयोगटातील मोठी विविधता. अवघ्या साडेचार वर्षांचा बाल खेळाडू ते ८७ वर्षांचे ज्येष्ठ खेळाडू अशा विविध वयोगटांतील बुद्धिबळपटू आपले कौशल्य पणाला लावणार आहेत. ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता स्पर्धेचा शुभारंभ होणार असून, त्यानंतर स्पर्धेतील सामने सुरू होतील. स्पर्धेत एकूण नऊ फेऱ्या होणार आहेत. १५ नोव्हेंबर दुपारी ३ वाजता बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. स्पर्धेतील विविध गटांमध्ये एकूण पाच लाख रुपयांची प्रोत्साहनपर रोख पारितोषिके, आकर्षक ७० करंडक तसेच सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर हेही या स्पर्धेचे वैशिष्ट्य राहणार आहे. अशा प्रकारचे १०० आंतरराष्ट्रीय दर्जाचे लाकडी बुद्धिबळ पट भारतात केवळ अहिल्यानगर येथेच वापरले जात असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत युगंधर वाघमारेची दैदिप्यमान कामगिरी

## गोळाफेकमध्ये रौप्यपदक, थाळीफेकमध्ये कांस्यपदक; राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

देवदैठण – येथील होतकरू खेळाडू युगंधर वाघमारे याने पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात गोळाफेक क्रीडा प्रकारात रौप्यपदक, तर थाळीफेक क्रीडा प्रकारात कांस्यपदक पटकावून आपल्या क्रीडाकौशल्याची चमक दाखवली आहे. विशेष म्हणजे, गोळाफेक या क्रीडा प्रकारात त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

युगंधर वाघमारे याने पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

३० ऑक्टोबर रोजी श्री संत ज्ञानेश्वर महाराज क्रीडा संकुल, पिंपरी–चिंचवड येथे पुणे विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत पुणे जिल्हा, पुणे शहर, सोलापूर जिल्हा, सोलापूर शहर, अहिल्यानगर जिल्हा, अहिल्यानगर शहर आणि पिंपरी–चिंचवड शहर या विभागांतील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा चुरशीच्या स्पर्धेत युगंधरने दोन्ही क्रीडा प्रकारांत पदकांची कमाई करत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या यशामागे त्याचे वडील पैलवान गणेश वाघमारे (राष्ट्रीय खेळाडू) यांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन लाभले आहे. तसेच त्याचे आजोबा पैलवान नामदेव वाघमारे यांचेही मार्गदर्शन मिळाले.

# वेस्टर्न एशियन बुद्धिबळ स्पर्धेत अदिना मोहंती हिस रौप्यपदक

## मलेशियातील सुवर्णपदकानंतर आता वेस्टर्न एशियन स्पर्धेतही भारताचा झेंडा उंचावला

नगर – आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ क्षेत्रात भारतीय युवा खेळाडू अदिना मोहंती हिने शानदार कामगिरीने पुन्हा एकदा देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. २३ ते २९ ऑक्टोबरदरम्यान पार पडलेल्या वेस्टर्न एशियन युथ क्लासिकल चेस चॅम्पियनशीप २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत अदिनाने १० वर्षांखालील मुलींच्या गटात रौप्यपदकाची कमाई केली.

नऊ फेऱ्यांच्या या स्पर्धेत अदिनाने तब्बल ७ गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. विशेष म्हणजे, संपूर्ण स्पर्धेत तिला एकदाही पराभवाचा सामना करावा लागला नाही. तिने चार सामने बरोबरीत सोडवले, तर उर्वरित सामन्यांमध्ये विजय मिळवला. प्रथम क्रमांकाच्या खेळाडूनेही ७ गुण मिळवले होते. मात्र, टायब्रेकरच्या गुणफरकामुळे अदिनाला रौप्यपदक मिळाले.

अदिनाचा हा विजय विशेष ठरण्याचे कारण म्हणजे, नुकतेच मलेशिया येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिने सुवर्णपदक पटकावले होते. त्यानंतर वेस्टर्न एशियन स्पर्धेत रौप्यपदक मिळवत तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप पाडली आहे.

वाघोलीच्या SW Chess Academy ची विद्यार्थिनी असलेल्या अदिनाला आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ प्रशिक्षक सत्यम वरुडे यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

# फॅन्सी ड्रेस स्पर्धेतून मुलांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते

## मुजम्मिल पटेल यांचे प्रतिपादन; स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे पारितोषिक वितरण

नगर – मुलांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळावी आणि त्यांच्यात आत्मविश्वासासह व्यासपीठावर सादरीकरण करण्याचे कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने करण्यात आलेले जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन कौतुकास्पद आहे. अशा स्पर्धांमुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे प्रतिपादन आकाशवाणी कार्यक्रम प्रमुख मुजम्मिल पटेल यांनी केले.

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करताना आकाशवाणी कार्यक्रम प्रमुख मुजम्मिल पटेल, कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे, स्नेहबंधचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, कांचन बिडवे.

स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने आकाशवाणी केंद्र अहिल्यानगर येथे नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय फॅन्सी ड्रेस स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आकाशवाणी कार्यक्रम अधिकारी सुदाम बटुळे, स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, स्पर्धेच्या प्रायोजक कांचन बिडवे–आहेर, सचिन पेंडुरकर, निशांत पानसरे, निखिल नरवणे, संकेत शेलार, श्लोक भोकरे उपस्थित होते.

बटुळे म्हणाले, मुलांना त्यांच्या आवडीनुसार विविध वेशभूषा साकारण्याची आणि स्वतःमधील कलागुण सादर करण्याची संधी फॅन्सी ड्रेस स्पर्धेमुळे मिळते. अशा उपक्रमांतून मुलांचा आत्मविश्वास वाढतो, त्यांची सर्जनशीलता विकसित होते आणि भविष्यातील कलावंत घडण्यास मदत होते. स्नेहबंध सोशल फौंडेशनचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी फौंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये किल्ले बनवा स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि फॅन्सी ड्रेस स्पर्धेचा समावेश आहे. मुलांनी केवळ अभ्यासातच नव्हे, तर कला, संस्कृती आणि सर्जनशीलतेच्या क्षेत्रातही प्रगती करावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. अशा स्पर्धांमधून उद्याचे कलावंत, लेखक आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्वे घडावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रास्ताविक करून आभार कांचन बिडवे (आहेर) यांनी मानले.

### फॅन्सी ड्रेस स्पर्धेतील विजेते

गट– १ ते ५ वर्षे : प्रथम : नील पेंडुरकर, द्वितीय : आर्यांश खामकर, तृतीय : आनंदी देसाई, उत्तेजनार्थ : दुर्वा माळवदकर, गट ६ ते १२ वर्षे : प्रथम : श्रिया शिंदे, द्वितीय : संस्कृती निस्ताने, तृतीय : नीलांबरी भिंगारदिवे, उत्तेजनार्थ : वैद्य ओंकार

# 'प्रियदर्शनी'च्या रुद्रप्रताप मुळेची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड

नगर – क्रीडा व युवक सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य) पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने विभागीय शालेय कराटे स्पर्धेमध्ये भिंगार येथील प्रियदर्शनी पब्लिक स्कूल अँड ज्युनियर कॉलेज इ. १२ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी रुद्रप्रताप गणेश मुळे याने बारामती येथे झालेल्या विभागीय शालेय कराटे स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला असून, त्याची शालेय राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला क्रीडा प्रशिक्षक आशिष भिंगारदिवे, प्रवीण शिर्के, सागर फाटके, अल्ताफ खान यांचे मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब खोमणे, प्राचार्या श्रीमती अंजली बोधक, संस्थेचे व शाळेचे पदाधिकारी यांनी अभिनंदन केले आणि भविष्यकालीन स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

# इसळक-निंबळक विद्यालयात मुलींसाठी सॅनिटरी वेंडिंग मशीनचे लोकार्पण

नगर – तालुक्यातील इसळक–निंबळक येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात कृष्णाप्रीत वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने आणि व्होगनस इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने सॅनिटरी पॅड व्हेन्डिंग मशीन व डिस्पोजल मशीनचा लोकार्पण सोहळा पार पडला. तसेच शालेय मुलींना मोफत सॅनिटरी पॅड वितरण व आरोग्य शिबीराचा कार्यक्रम घेण्यात आला.

इसळक–निंबळक येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालयात कृष्णाप्रीत वेल्फेअर फाउंडेशन यांच्या वतीने आणि व्होगनस इंडिया लिमिटेड यांच्या सहकार्याने विद्यार्थिनींच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने सॅनिटरी पॅड व्हेन्डिंग मशीन व डिस्पोजल मशीनचा लोकार्पण सोहळा पार पडला.

स्वागत विद्यालयाच्या लेझीम पथकाने केले. यावेळी नवदुर्गा शक्तिरूपात सजलेल्या विद्यार्थिनींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या विविध रूपांची उपस्थितांना ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हॉगनास इंडियाचे प्लांट हेड शरद मगर होते. कृष्णप्रित फाउंडेशनचे संचालक प्रशांत शेळके, संस्थेचे सहसचिव अविनाश कोतकर, जगताप हॉस्पिटलच्या वैद्यकीय मार्गदर्शक डॉ. नयना जगताप, सेवानिवृत्त सिव्हिल हॉस्पिटल मेट्रन छाया निमसे, उद्योजक राजेंद्र गायकवाड, सुनील शिंदे, वृषाली अबुज, सरपंच प्रियंका लामखडे, भागवत शेळके, रावसाहेब शेळके, आरोग्य अधिकारी आकाश बोरबने आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. जगताप यांनी विद्यार्थिनींना कळी उमलताना या विषयावर मार्गदर्शन केले.

मगर यांनी विद्यार्थिनींच्या आरोग्यविषयक गरजा, वैयक्तिक स्वच्छता आणि शिक्षणातील आत्मविश्वासाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थिनींचे भविष्य उज्ज्वल घडविण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे सांगत विद्यालयातील विद्यार्थिनींची संख्या वाढविण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. विद्यार्थिनींना सुरक्षित, स्वच्छ आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कृष्णप्रित वेल्फेअर फाउंडेशनने केलेले सहकार्य निश्चितच कौतुकास्पद आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य व स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक बांडे सर यांनी केले.

मुख्याध्यापिका श्रीमती जाजगे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियोजनातून हा कार्यक्रम यशस्वी पार पडला.

# श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर ५ हजार दिव्यांचा दीपोत्सव

## कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताह

नगर – श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड येथे खानावले, पनवेल येथील मोहन लबडे यांच्या वतीने त्यांचे वडील कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या ११ वर्षांपासून मोहन लबडे महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांवर या धार्मिक सोहळ्याचे आयोजन करून वारकरी संप्रदायाची परंपरा जपण्याचे आणि वारकऱ्यांची सेवा करण्याचे कार्य करीत आहेत. यंदा २३ ऑक्टोबरपासून श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर धार्मिक उत्सवाला सुरुवात झाली असून, ज्ञानेश्वरी पारायण, भजन, हरिपाठ, कीर्तनसेवा आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड येथे कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पाच हजार दिव्यांचा दीपोत्सव साजरा करण्यात आला. या दीपोत्सवामुळे गोरक्षनाथ गड उजळून निघाला.

या सप्ताहानिमित्त खानावले, पनवेल येथून सुमारे एक हजार वारकरी गडावर दाखल झाले आहेत. पांढराशुभ्र पोशाख आणि डोक्यावर पांढरी टोपी परिधान केलेल्या वारकऱ्यांचे उपस्थित भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि गोरक्षनाथ महाराज यांच्या जयघोषाने संपूर्ण गड परिसर दुमदुमून गेला. कोजागिरी पौर्णिमेनिमित्त पाच हजार दिव्यांचा दीपोत्सव साजरा करण्यात आला. या दीपोत्सवामुळे श्री क्षेत्र गोरक्षनाथ गड उजळून निघाला आणि धार्मिक वातावरण अधिक प्रसन्न झाले.

मोहन लबडे यांनी वडील कै. बाळाराम लबडे यांच्या स्मरणार्थ गेल्या ११ वर्षांपासून महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रांवर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्याची परंपरा सुरू ठेवली आहे. पहिल्या वर्षी पारनेर तालुक्यातील पिंपळनेर येथे या उपक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पैठण, आपेगाव, मुक्ताईनगर, त्र्यंबकेश्वर, सासवड, रेडेश्वर, वृद्धेश्वर, पुणतांबे, पैठण आणि गहिनीनाथ गड अशा विविध तीर्थक्षेत्रांवर सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यंदा श्री क्षेत्र गोरक्षनाथ गडावर हा धार्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावाने आणि आध्यात्मिक उत्साहात सुरू आहे.

या सप्ताहात ह.भ.प. ईश्वर महाराज कदम यांची कीर्तनसेवा संपन्न झाली. त्यांनी आपल्या कीर्तनातून संतांचे महत्त्व आणि संतविचारांचे जीवनातील स्थान विशद केले. संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा दिली. त्यामुळे प्रत्येकाने संतांचे विचार आपल्या आचरणात आणणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी ह.भ.प. ईश्वर महाराज कदम, मोहन लबडे, योगिता लबडे, रोहन लबडे, श्रद्धा लबडे, सरपंच रूपाली कदम, उपसरपंच जालिंदर कदम, देवस्थानचे सचिव गोरक्षनाथ कदम यांच्यासह वारकरी आणि भक्तगण उपस्थित होते.

# मिलन ग्रुप व ओमकार लेंडकर मित्र मंडळातर्फे महाप्रसाद

नगर – नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोड येथे मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. धार्मिक श्रद्धा, भक्तिभाव आणि सामाजिक एकोपा जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला परिसरातील नागरिकांचा सहभाग लाभला.

नवरात्रोत्सव आणि कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोड येथे मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

नवरात्रोत्सव हा शक्तीची उपासना करण्याचा, तर कोजागिरी पौर्णिमा हा भक्तिभाव आणि आनंदाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. या दोन्ही धार्मिक पर्वांचे महत्त्व लक्षात घेऊन मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात देवीच्या महाआरतीने करण्यात आली. उपस्थितांनी भक्तिभावाने देवीची आरती केली आणि देवीचरणी नतमस्तक होत सर्वांच्या सुख, समृद्धी व कल्याणासाठी प्रार्थना केली. महाआरतीनंतर महाप्रसाद वितरणास प्रारंभ करण्यात आला. यावेळी उपस्थित नागरिक आणि भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

धार्मिक उत्सवांच्या माध्यमातून समाजातील नागरिकांना एकत्र आणणे, परस्परांमध्ये स्नेहभाव वाढविणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, हा अशा उपक्रमांचा महत्त्वाचा उद्देश असतो. मिलन ग्रुप मित्र मंडळ आणि ओमकार लेंडकर मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या महाप्रसादाच्या उपक्रमातून धार्मिक परंपरेचे जतन करण्यासोबतच सामाजिक एकोप्याचा संदेश देण्यात आला.

या प्रसंगी मंडळाचे ओम जिंदम, प्रथमेश गुज्ञा, दर्शन गालपेली, विशाल अनारसे, शुभम जोग, कुणाल बडगु, कृष्णा मुदिगोंडा, निखिल तौटी, भैय्या गोंधळे, आकाश इमले, ऋषी गालपेली, सजल लोखंडे, निशांत यांच्यासह मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### घरच्या घरी रक्तदाब आणि रक्तातील साखर कशी तपासावी

आजकाल प्रत्येक घरात रक्तदाब आणि मधुमेहाचे रुग्ण असतात. वारंवार दवाखान्यात जाणे शक्य होत नाही. म्हणून घरीच तपासणी कशी करावी हे प्रत्येकाने शिकून घ्यावे. घरासाठी आपोआप रक्तदाब मोजणारे यंत्र मिळते. ते मनगटाचे किंवा दंडाचे असते. दंडाचे यंत्र जास्त अचूक असते.तपासण्याची पद्धत – सकाळी चहा पिण्याआधी आणि संध्याकाळी जेवणाआधी तपासावे. तपासण्यापूर्वी पाच मिनिटे शांत बसावे. धावपळ, चिडचिड झालेली असताना तपासू नये. खुर्चीत पाठीला टेकून बसावे. पाय जमिनीवर सरळ ठेवावेत. पट्टी कोपरापासून दोन बोटे वर बांधावी. पट्टी घट्ट किंवा सैल नसावी. यंत्र सुरु करावे आणि हात हलवू नये. दोन वेळा मोजून त्याची सरासरी लिहून ठेवावी.काळजी काय घ्यावी – एकच वेळ रोज नोंदवावी. चहा, बिडी, तंबाखू घेतल्यानंतर लगेच तपासू नये. यंत्राची जोडणी बिघडली असेल तर चुकीचा आकडा येतो. साधारण आकडा १२०/८० च्या आसपास असतो. वरचा आकडा १४० पेक्षा जास्त किंवा खालचा ९० पेक्षा जास्त आला तर डॉक्टरांना दाखवावे. रक्तातील साखर कशी तपासावीबोट टोचून रक्त तपासणारे छोटे यंत्र मिळते. त्याला साखर मोजपट्टी लागते.तपासण्याची पद्धत – हात साबणाने धुऊन कोरडे करावेत. ओल्या हाताने तपासू नये. टोचणीने बोटाच्या कडेला टोचावे. पहिला थेंब पुसून टाकावा. दुसरा थेंब पट्टीवर घ्यावा. यंत्रावर आकडा येईपर्यंत वाट पहावी. सकाळी काहीही न खाता – उपाशी पोटी जेवणानंतर दोन तासांनी उपाशी पोटी १०० पेक्षा कमी आणि जेवणानंतर १४० पेक्षा कमी आकडा चांगला मानतात. उपाशी १२६ पेक्षा जास्त आणि जेवणानंतर २०० पेक्षा जास्त आला तर डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घरचे यंत्र हे फक्त अंदाजासाठी असते. गोळ्या बंद करणे किंवा बदलणे स्वतःच्या मनाने करू नये. वहीत रोजची नोंद लिहून ती वही डॉक्टरांना दाखवावी म्हणजे औषध ठरवणे सोपे जाते.

## पाककला

### व्हेज खिमा

**साहित्य :** किसलेला फ्लॉवर १ मध्यम, किसलेले गाजर १, बारीक चिरलेली शिमला मिरची १/२, बारीक चिरलेला कांदा २ मध्यम, बारीक चिरलेला टोमॅटो २, किसलेला पनीर १०० ग्रॅम, उकडलेले वाटाणे १/२ वाटी, आले लसूण पेस्ट १ चमचा, २ चमचे तेल, १ चमचा बटर, १ चमचा लाल तिखट, १/२ चमचा हळद, १ चमचा गरम मसाला, १/२ चमचा जिरे पावडर, १/४ चमचा काळी मिरी पावडर, चवीनुसार मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर २ चमचे

**कृती :** कढईत तेल आणि बटर गरम करून घ्या. त्यात जिरे, बारीक चिरलेला कांदा घालून सोनेरी रंग येईपर्यंत परतून घ्या. त्यात आले लसूण पेस्ट, चिरलेला टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत परतवा. त्यात हळद, लाल तिखट, गरम मसाला, जिरे पावडर, काळी मिरी पावडर, मीठ घालून मिश्रण एकजीव करा. आता त्यात किसलेला फ्लॉवर, गाजर, शिमला मिरची, वाटाणे घालून ४ ते ५ मिनिटे मध्यम आचेवर परतून घ्या. भाज्या अर्धवट शिजल्यावर त्यात किसलेले पनीर घालून हलक्या हाताने मिसळा. झाकण ठेवून ३ ते ४ मिनिटे वाफ काढा. तयार खिम्यावर बारीक चिरलेली कोथिंबीर आणि वरून थोडे बटर घाला. तयार वेज खिमा गरम रोटी किंवा पावा बरोबर सर्व्ह करा.

## वास्तू

### मंत्र आणि भजन

* घरात रोज थोडा वेळ मंत्र किंवा भजन लावावे.

* घराचे छत गळत असेल तर लगेच दुरुस्त करावे.

* घराच्या बाहेर लिंबू मिरची बांधल्याने वाईट नजर लागत नाही.

* घरात हसणारे मूल आणि मोराचा फोटो पूर्वेला लावावा.

## सौंदर्य

* आंघोळीच्या पाण्यात लिंबू + मीठ टाका, अंगाचा वास जातो.

* हातावर बटाटा घासल्यास टॅनिंग जाते.

* पायाला रात्री व्हॅसलीन + मोजे घाला, मुलायम होतात.

## सल्ला

सामोसा खुसखुशीत होण्यासाठी गरम तेलाचे मोहन टाका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६

**भानुसप्तमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन कृष्णपक्ष, पुष्य २८।३१, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०६ वा. २९ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आज पैशासंबंधी कामे मार्गी लागतील.

**वृषभ :** जुन्या मित्राची भेट होईल, मन प्रसन्न राहील.

**मिथुन :** कामात नवीन संधी मिळेल, कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल.

**कर्क :** किरकोळ वाद होण्याची शक्यता, आरोग्य बिघडेल.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल, महत्त्वाचे काम पूर्ण होईल.

**कन्या :** खर्च वाढेल, प्रवासाचा योग आहे.

**तूळ :** भागीदारीत लाभ होईल, जोडीदाराची साथ मिळेल.

**वृश्चिक :** शत्रूवर विजय मिळेल, अडकलेले काम होईल.

**धनु :** मुलांकडून चांगली बातमी मिळेल, अभ्यासात मन लागेल.

**मकर :** घरातील प्रश्न सुटतील, मालमत्तेचा लाभ होईल.

**कुंभ :** धाडस वाढेल, भावंडांची मदत मिळेल.

**मीन :** वाणीवर नियंत्रण ठेवा, धनलाभ होण्याची शक्यता आहे.

## शब्दगंध क्र. ७५४८ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७५४७ चे उत्तर

**आडवे शब्द :-** २) झाडाची पाने वगैरे केरकचरा ४) गोंधळ; गडबड; गलका; गलबला ७) उत्तराधिकार; वडिलोपार्जित संपत्तीवरचा हक्क ८) स्त्रियांचे एक वस्त्र १०) नूतन; नवीन ११) विष्णू १२) पक्का; दृढ निश्चयी १४) वर्ण; कास्ट १६) बाब; गोष्ट; रक्कम; लेखणी १८) पूर्ण भरतीची वेळ २०) गाठ; लढाई; पडताळा २१) एक प्रकारचा साप २२) एक मराठी संत ज्यांनी 'दासबोध' ग्रंथ लिहिला

**उभे शब्द :-** १) बागकाम करणारा; माळी; फुलधर; बनकर २) शिळा; अंघोळ न केलेला ३) तोंडात तयार होणारा चिकट रस; मुखरस ५) उंबरठा ६) धृतराष्ट्र व गांधारीचे पुत्र या नावाने ओळखली जातात ८) सामान; सामुग्री ९) लागून; जवळ १३) समाधी; थडगे; कबर १५) उदाहरण; मासला १७) भूषण; अलंकार १८) गोडधोड करून खाण्याचा किंवा उत्साहाचा दिवस १९) उदाहरण; नमुना २१) गुच्छ; झुबका; झेला; जुडगा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार :** चुका शोधायला मेंदू लागतो, पण त्या स्वीकारायला काळीज लागतं.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### दूरचित्रवाणीचा हातातील नियंत्रक कसा चालतो?

आपण हातातील छोट्या पेटीतील कळ दाबतो आणि समोरचा पडदा चालू होतो किंवा आवाज वाढतो हे आपल्याला रोजचे वाटते पण यामागे प्रकाशाचा एक अदृश्य खेळ आहे.

या छोट्या पेटीच्या पुढच्या टोकाला एक छोटा दिवा असतो. आपल्याला तो दिसत नाही. जेव्हा आपण कळ दाबतो तेव्हा आतल्या घटकातून वीज वाहते आणि तो दिवा एका खास प्रकारचा प्रकाश बाहेर टाकतो. हा प्रकाश आपल्या डोळ्याला दिसत नाही पण तो प्रकाश सामान्य प्रकाशासारखा सरळ जातो. समोरच्या मोठ्या पडद्याच्या यंत्रावरही एक डोळा असतो. तो या अदृश्य प्रकाशाला ओळखतो. प्रत्येक कळेसाठी प्रकाशाची उघडझाप वेगवेगळ्या लयीत होते. जसे आपण लहानपणी टॉर्चने इशारे करायचो तसेच. एका कळेची लय लहान मोठ्या टपक्यांनी बनलेली असते. समोरचा डोळा ती लय ओळखतो आणि आतल्या यंत्राला सांगतो की आता आवाज वाढव किंवा पडदा बंद कर.

या पेटीत दोन लहान विजेरी असतात. त्यांच्या शक्तीवर हा दिवा चालतो. समोर अडथळा आला तर हा प्रकाश अडतो म्हणून नियंत्रक समोर धरावा लागतो. या प्रकाशाला भिंत किंवा धूळ अडवू शकते. म्हणूनच कळ दाबली की लगेच काम होते कारण प्रकाशाचा वेग खूप जास्त असतो.

### दोन विटा

मंदिर बांधण्यासाठी हजारो विटा आल्या. त्यात दोन विटा शेजारी होत्या. एक अगदी चकचकीत आणि सुंदर, दुसरीचा एक कोपरा तुटलेला. चकचकीत वीट तुटक्या विटेला हसली, तू तुटकी आहेस, तुला कोणीच घेणार नाही. मला तर गाभाऱ्यात लावतील. दुसऱ्या दिवशी गवंडी आला. त्याने सुंदर विटेला उचलून मंदिराच्या बाहेरच्या दर्शनी भिंतीत लावले. तिला खूप आनंद झाला. मग त्याने तुटक्या विटेला पाहिले आणि म्हणाला, ही तुटकी आहे पण खूप मजबूत आहे. त्याने तिला मंदिराच्या पायात, अगदी खोलवर बसवले जिथे सगळे वजन पेलले जाते. काही वर्षांनी बाहेरची वीट ऊन पावसाने झिजून गेली. तिने पायातल्या विटेला विचारले, तुला तर कोणी पाहतही नाही. तुटकी वीट म्हणाली, मी दिसत नाही, पण मीच हे मंदिर उभे ठेवते. तू मंदिराची शोभा आहेस, मी मंदिराचा आधार आहे.

बोध – माणसाची किंमत दिसण्यावर नाही, तर त्याच्या कामावर ठरते.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

ह्या शब्दधारा (नाद) परमेश्वरापासून येतात व शेवटी त्या आमच्या आत्म्याला दुसऱ्या जगात खेचून नेतात. वेगवेगळ्या धर्मामध्ये ध्यान साधनाचे संदर्भध्यान-साधनेच्या ह्या दुहेरी पद्धतीचा वेगवेगळ्या धर्मातील संत आणि महापुरुषांनी अभ्यास केला आहे. ज्योति आणि श्रुतीला वेगवेगळ्या भाषांत आणि संस्कृतीमध्ये वेगवेगळ्या शब्दांनी संबोधले गेले आहे.

म्हणून आम्ही या अभ्यासांना वेगवेगळे समजू शकतो. परंतु ह्यांचा मूळ सिद्धांत एकच आहे. उदा. बायबलमध्ये ज्योति आणि श्रुतीला 'होली वर्ड' वा 'शब्द' असे म्हटले आहे. 'तुम्ही कानांनी ऐकाल परंतु समजणार नाही,

डोळ्यांनी पहाल सुद्धा पण त्याचा बोध होणार नाही.'(मत्ती १३:१४)

'धन्य आहेत तुमचे डोळे की ते पाहतात आणि धन्य तुमचे कान की जे ऐकतात. कारण मी तुम्हाला सत्य तेच सांगत आहे. ज्या गोष्टी तुम्ही

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

शिवानीदीदी : हो, या सगळ्यातून आपण जसे बाहेर पडू तसे आपण आपल्या अहंकारावर विजय मिळवू आणि आपण स्वतःभोवती बांधलेल्या बंधनातून मुक्त होऊ. जेव्हा जेव्हा आपल्याला स्वतःमध्ये सकारात्मक बदल दिसेल तेव्हा तेव्हा आपण आपली पाठ थोपटली पाहिजे. स्वतःच तयार केलेल्या संकुचित विचारसरणीतून बाहेर पडणं किंवा ती बदलणं खूप अवघड नाही हे आपण स्वतःला सांगायला हवं.

सुरेश ओबेरॉय : मी नेहमीच मर्यादित विचारसरणीत राहिलो आहे. पूर्वी, माझी हेडलाईन विशालापर्यंत नेण्यासाठी मी हिमालयाची वाट बघायचो.

शिवानीदीदी : हे सगळं करत असताना तुमच्या मनाचा अँटेना काय पकडत असेल? लोक माझ्याकडे बघत आहेत असा विचार तुम्ही करायचा. तुमच्या घरात मात्र तुम्ही कितीही बडबड, राग उगाळत असाल कारण तुम्हाला माहित असतं की तुमच्याकडे कोणी बघत नाहीये.

सुरेश ओबेरॉय : मला राजेशाही पद्धतीची जीवनशैली आवडत होती. यातील काही सवयी मी माझ्या वडिलांकडून उचलल्या.

शिवानीदीदी : मूव्ही स्टार म्हणजे अशी व्यक्ती जी स्वतःचं सामान स्वतः उचलणं यांसारखी कामं करत नाही अशी व्याख्या तुम्ही केली. जेव्हा लोक असं वागतात तेव्हा त्यांना इतरांकडून आदर मिळतो आणि त्यांची प्रशंसा होते, तर ते असं काही...

तुमच्या क्षमतेनुसार काम कराकरत नसतील तर त्यांना श्रेष्ठ समजलं जात नाही, अशा विचारांनी तुम्ही तुमच्या मनाचं प्रोग्रॅमिंग केलं. मनाच्या अशा प्रोग्रॅमिंगमुळेच सगळा गोंधळ झाला आहे.सुरेश ओबेरॉय : आता मी जाणूनबुजून इनकॉग्निटो क्लासमध्ये प्रवास करतो.

शिवानीदीदी :

साधेपणा हा आपलं मन शांत ठेवण्याचा सोपा मार्ग आहे. आपण फक्त अन्न सेवन करण्याची आणि नॉनस्टिक कार्ड परिधान करण्याची पण तरीही साधं राहण्याची गरज आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : अहो ऐकलं का, आपल्या शेजाऱ्याने बायकोसाठी हिरा घेतला!

नवरा : आपण पण घेऊया, हिरा कुत्रा.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* '५२ कशांचे बाग' (५२ दरवाजांचे शहर) म्हणून महाराष्ट्रातील कोणत्या शहराला ओळखले जाते? – छत्रपती संभाजीनगर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'प्रिय अमिताभ....'

प्रिय अमिताभ, ८५ व्या वर्षातील तुमचं पदार्पण, माझ्यासारख्या कोट्यावधी चाहत्यांसाठी नक्कीच आनंददायी, प्रेरणादायी आहे. मी, दुसऱ्यावेळी तुम्हाला पत्र लिहित आहे. ह्या आधी कुली चित्रपटाच्या शुटिंग दरम्यान तुमचा अपघात झाला होता. तुम्ही ब्रीच कॅन्डी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होते. त्यावेळी पहिलं पत्र पाठवलं होतं, त्याचं उत्तरही मिळालं होतं.

खरं तर अमिताभ ह्या नावात एक जादु आहे. तुम्ही आजही, एखाद्या तरुणाला लाजवेल असं काम प्रति एकनिष्ठ असुन कार्यरत आहात हे आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. म्हणूनच तुम्ही आजही आमच्यासाठी प्रेरक आहात. शोले आणि मुकद्दर का सिकंदर पाहिला तेव्हापासून तुम्ही भूमिका केलेले अनेक चित्रपट पाहिले. आम्ही अमिताभमय झालो तेव्हा पासून अगदी आजही. १०२ नॉट आऊट, बदला ह्या चित्रपटांपर्यंतचे तुमचे चित्रपट मी पाहिले काही चित्रपट दोन-दोन तीन-तीन वेळा पाहिले. अग्निपथमध्ये तुमचा बदललेला आवाज आजही ऐकु येतो आहे. विजय दीनानाथ चौहान. पुरा नाम. विजय नाव घेऊन तुम्ही अनेक चित्रपटांमध्ये भूमिका केल्या आहेत. सुहाग, वक्त (रेस अगेंस्ट टाईम), दिवार (जुना आणि नवा), आँखे, नमक हलाल, आनंद, नास्तिक, हेरा-फेरी, देशप्रेमी, महान, खुद्दार, लावारिस, कभी-कभी.... तुमच्या चित्रपटांची नावं लिहिली तरी त्यातील तुमचा लुक डोळ्यांसमोर येतो. शराबी, मुकद्दर का सिकंदर, दिवार, त्रिशुल ह्यांसह अनेक चित्रपट आवडले. जे चित्रपट काही कारणास्तव पाहाणं झालं नाही ते आता ओटीटी आणि युट्युबवर पाहातो. तुमच्या नावाची जादु पन्नास वर्षांपूर्वीही होती, आजही आहे. बॉलिवुडचा शहेनशहा, सदीका महानायक, बीग बी, वेळेचा आदर करणारा कलाकार... आजही तुम्ही माझ्यासाठी अमिताभ ऐवजी अभिता बच्चन आहात. तुमच्या चित्रपटांनी समाजाला बरंच काही चांगलं असं दिलं आहे. १०२ नॉटआऊट हा सर्वाधिक आवडलेला चित्रपट.

मोठ्या पडद्यापासून सुरु झालेला तुमचा प्रवास कौन बनेगा करोडपतीच्या माध्यमातुन छोट्या पडद्यापर्यंत आला. छोट्या पडद्यावरही तुमच्या नावाची जादु आहे. आजपासून बावीस, तेवीस वर्षांपूर्वी केबीसी कार्यक्रम पाहण्यासाठी घरातला प्रत्येक सदस्य रात्री ९ वाजता छोट्या पडद्यासमोर बसायचा. त्यावेळी प्रत्येकजण रात्री नऊ वाजता कधी एकदा अभिता बच्चन पाहायला मिळेल ह्या मनापासूनच्या इच्छेने टीव्हीसमोर बसायचा. तुम्ही एकदा बाबुजी (हरिवंशराय बच्चन) ह्यांना प्रश्न विचारला होता, तुमच्या संघर्षाच्या काळात- 'बाबुजी, मुझे कब तक संघर्ष करना पडेगा ?' – बाबुजींनी उत्तर दिलं होतं- 'जब तक जीवन हे तब तक संघर्ष है.'- तुम्ही संघर्ष खूप केला. अगदी वयाच्या साठीच्या जवळपास असतांना ए. बी. सी. एल. मध्ये प्रचंड नुकसान झालं आणि तुम्ही आर्थिकदृष्ट्या कमकुवत झालात. पण जिद्दीने, आत्मविश्वासाने तुम्ही संघर्ष केलात. पुन्हा गरुडझेप घेतली. मी, तुमच्याविषयी वाचन केलं आहे तेव्हा लक्षात आलं अमिताभ होणं सोप्पं नाही. सदीका महानायक होणं अशक्य आहे. सर्वसामान्याच्या मनातला हिरो, तुमच्यारुपात आम्ही गेल्या पन्नास वर्षांहुन अधिक काळापासून पाहात आलो आहोत. 'अँग्री यंग मॅन' ही इमेज निर्माण करण्यात तुम्ही त्यावेळी यशस्वी झालात. तुम्ही, स्वतःला घडवतांना आजपर्यंत काय काय केलं असेल ह्याचा आम्ही फक्त विचार केला तरी तुमचा संघर्ष नजरेसमोर येतो. तुमच्यापासून शिकण्यासारखं खूप आहे. अनेकांनी तुमच्यातले अनेक गुण आत्मसात केले आहेत. त्यांचं भविष्य उज्वल झालं आहे. तुमच्याविषयी कुणी बोलत असेल तर मनापासून ऐकावसं वाटतं.

अमिताभ होणं सोप्पं नाही हे खरं असलं तरी अमिताभ होण्याचा प्रयत्न करणं नक्कीच आपल्या हातात आहे. अमिताभ होण्याचा प्रयत्न का करु नये ? हा एकच प्रश्न मी स्वतःला विचारला आणि माझ्या लक्षात आलं. की मी, तुमच्यासारखा वेळेचा आदर नक्कीच करु शकतो. म्हणून गेल्या २५ पेक्षा अधिक वर्षांपासून दिलेली वेळ पाळण्याचा हजार टक्के प्रयत्न करतो आहे, केला आहे, ह्यापुढेही करणारंच आहे. तुम्ही वेळेचा आदर केला, आजही करत आहात म्हणून वेळेनंही तुमची कदर केली आहे. तुमच्या चित्रपटातील तुमच्या तोंडी असलेले संवाद, ती संवादफेक, अन्यायाविरुध्द लढण्याची वृत्ती, तुमची देहबोली, विशिष्ट लयीतले तुमचे संवाद... डॉनको पकडना मुश्किलही नही, नामुमकीन है। ये पुलिस स्टेशन है, तुम्हारे बाप का घर नही.' तुमच्या विषयी लिहायला मिळालं हे माझं भाग्य मी समजतो. तुमचा शंभरावा वाढदिवस तुम्ही साजरा करावा ह्यासाठी मनापासून प्रार्थना. तुमचा चाहता – सुनील रंजना वनाजी राऊत.

(लेख क्र.६२४)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

१२) समावर्तन संस्कार : शिक्षण संपल्यानंतर ज्ञानार्जन प्राप्त करून परीक्षांमध्ये उत्तीर्ण झाल्यावर आपल्या गुरुंकडून आशीर्वाद घेऊन गुरुकुलाचा म्हणजेच आताच्या काळात कॉलेजचा निरोप घेण्याच्या क्रियेला समावर्तन संस्कार म्हणतात.

१३) विवाह संस्कार : योग्य वय असलेले स्त्री व पुरुष आयुष्यभर एकमेकांची साथ देण्यासाठी व आपल्या जन्माच्या हेतूने एकत्र येतात, एकमेकांशी बांधले जातात.

यालाच विवाहसंस्कार म्हणतात. विवाहसंस्कारापासून गृहस्थाश्रमाची सुरुवात होते. पुरुषाचे विवाह करते वेळी वय कमीत कमी २५ वर्षे असावे व तो शक्तिसंपन्न असावा आणि स्त्रीचे वय कमीत कमी १८ वर्षांचे

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# निरामय

## ब्रेकअपमुळे वाढतोय 'ब्रोकन हॉर्ट'

ब्रेकअप झालं, एखादी जवळची व्यक्ती गमावली किंवा अचानक मोठा धक्का बसला की, आपण सहज म्हणतो की, मी दुखावलो गेलोय किंवा माझं हृदय तुटलं; पण ही गोष्ट हलक्यात घेऊ नका. खूप जास्त मानसिक ताण आला, तर त्याचा परिणाम थेट हृदयावर होतो. यामुळे हृदयविकाराचा धोका वाढतो किंवा काही वेळा ही परिस्थिती गंभीर होऊ शकते. या आजाराला 'ब्रोकन हॉर्ट सिंड्रोम' असे म्हणतात.

'ब्रोकन हार्ट' ही फक्त फीलिंग नसून, हृदयाशी संबंधित गंभीर आजार आहे. त्यामुळे हृदयविकाराचा बळावतो. या आजारात जवळच्या व्यक्तीला गमावल्याने किंवा कोणती दु:खद घटना घडल्याने हृदय कमजोर होते. आजारी व्यक्ती सतत त्या घडलेल्या गोष्टीच्या विचारात अधिक गुंतत जाते. याचा परिणाम हृदयावर होतो. त्यामुळे हार्ट ॲटक येण्याचे धोका अधिक वाढतो, असे तज्ज्ञ सांगतात. नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण झाल्याने अनेकदा भविष्यात ब्रेकअप होते आणि याचा परिणाम थेट आरोग्यावर होऊ शकतो. ब्रेकअपसोबतच जवळच्या व्यक्तीचा मृत्यू, विश्वासघात, भावनिक आघात, भीती, तणाव अशी काही कारणेदेखील 'ब्रोकन हार्ट' या सिंड्रोमसाठी कारणीभूत ठरू शकतात.

ब्रोकन हार्ट सिंड्रोम आणि हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणे ही जवळपास सारखीच असतात. सतत काही काळ शॉकमध्ये राहिल्याने तणाव वाढत जातो. त्याचा परिणाम हा आहारावर होतो. त्यामुळे हाता-पायांना मुंग्या येणे, चक्कर येणे यांसारखी लक्षणे दिसतात. दुसरीकडे सामान्यत: हृदयाशी संबंधित काही आजारांमध्ये कोरोनरी आर्टरी किंवा नस ब्लॉक झाल्यामुळे हृदयापर्यंत पुरेसे रक्त आणि ऑक्सिजन पोहोचत नाही. त्यामुळे हार्ट अटॅक येऊ शकतो. बहुतेक वेळा ब्रोकन 'हार्ट सिंड्रोम'मध्ये छातीत दुखणे, हृदय जोरात धडधडणे, चक्कर येणे, उलट्या येणे किंवा सतत आंबट ढेकर येणे ही लक्षणे दिसू शकतात. त्यामुळे याकडे दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांशी संपर्क साधून उपचार घेणे फायद्याचे ठरते.

सतर्क व्हा

## डेंगी आणि तापाचा हृदयावर परिणाम

आरोग्य विशेष

डॉ. कुंदन गायकवाड

देशभरातील अनेक राज्यांमध्ये डेंगी आणि विषाणूजन्य तापाचे रुग्ण झपाट्याने वाढत आहेत. डेंगी हा एडिस इजिप्ती डासाच्या चाव्यामुळे होतो तर विषाणूजन्य ताप बदलत्या हवामानामुळे आणि विषाणूजन्य संसर्गामुळे पसरतो. दोन्ही आजारांमध्ये उच्च ताप, अंगदुखी, थकवा आणि अशक्तपणा अशी लक्षणे दिसून येतात.

डेंगीमुळे प्लेटलेटची संख्या झपाट्याने कमी होऊ शकते. विषाणूजन्य ताप सामान्यत: काही दिवसांतच बरा होतो; परंतु तो शरीराची प्रतिकारशक्ती कमकुवत करू शकतो. डेंगी आणि विषाणूजन्य ताप शरीराला आतून कमकुवत करतो. डेंगीमध्ये प्लेटलेट्स कमी झाल्यामुळे रक्तस्राव आणि अवयवांचे नुकसान होण्याचा धोका वाढतो. दीर्घकाळापर्यंत विषाणूजन्य ताप यकृत, मूत्रपिंड आणि श्वसनसंस्थेवर दबाव आणू शकतो. या आजारांमुळे सततचा थकवा, डोकेदुखी, सांधेदुखी आणि निर्जलीकरण यासारख्या समस्या देखील उद्भवतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत झाल्यामुळे शरीर इतर संसर्गांना बळी पडते.

**हृदयावरही परिणाम होतो का?**

डेंगी आणि विषाणूजन्य ताप शरीरावरच नाही तर हृदयावरही परिणाम करू शकतो. डेंगीमध्ये, विषाणू थेट हृदयाच्या स्नायूंवर परिणाम करू शकतो. त्यामुळे मायोकार्डिटिस नावाची स्थिती निर्माण होते. यामुळे हृदयाचे ठोके अनियमित होतात आणि पंपिंग क्षमता कमी होते. अनेक प्रकरणांमध्ये, रक्तदाब कमी होणे आणि शॉक यासारखी स्थिती दिसून येते.

**लक्षणे**

विषाणूजन्य तापात दीर्घकाळापर्यंत ताप येणे आणि शरीरातील सूज येणे यामुळे हृदयावर अतिरिक्त ताण येतो. विषाणूजन्य संसर्ग हृदयाच्या स्नायूंवर आणि त्याच्या विद्युत क्रियाकलापांवर परिणाम करू शकतात. त्यामुळे हृदयाचे ठोके असामान्य होतात. डेंगी आणि विषाणूजन्य ताप हृदयरोग असणाऱ्या लोकांसाठी अधिक धोकादायक असू शकतो. अशा परिस्थितीत वेळेवर उपचार आणि योग्य देखरेख केल्याने धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो.

**या गोष्टी लक्षात ठेवा**

* डासांपासून संरक्षण करण्यासाठी पूर्ण बाह्यांचे कपडे घाला.
* घराभोवती पाणी साचू देऊ नका.
* जास्त ताप, अंगदुखी किंवा प्लेटलेटची संख्या कमी झाल्यास तावडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.
* भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ प्या.
* हृदयरोग्यांनी तापादरम्यान विशेष काळजी घ्यावी.
* डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेऊ नका.

**टाळा गोड पदार्थ**

मधुमेह असेल तर साखरेऐवजी गूळ खाल्ल्यास धोका दूर होतो असा एक समज दिसतो. मात्र तो चुकीचा आहे. साखरेप्रमाणेच गुळातही सुक्रोज हा घटक असतो. हा घटक रक्तातील साखरेचं प्रमाण वाढवण्यास कारक ठरतो. गूळ साखरेपेक्षा कमी वेगाने रक्तात मिसळतो. त्यामुळे गुळाच्या सेवनाने ब्लड शुगर वाढत नाही असं नाही मात्र, ती तात्काळ वाढत नाही. हा परिणाम काही वेळाने बघायला मिळतो. गुळामध्ये ६५ ते ८५ टक्के सुक्रोज असल्यामुळे मधुमेहींसाठी याचं सेवन अयोग्य आहे हे समजून घ्यायला हवं. इतकंच नव्हे, तर नैसर्गिक गोडी आहे असं समजून मधुमेहींनी मधाचं सेवन करणंही धोकादायक ठरु शकतं. एकंदरीत, या रुग्णांनी कोणत्याही गोड घटकांचं सेवन मर्यादित ठेवावं. आहार आणि नियमित व्यायामाचं पथ्य पाळणं हाच मधुमेह नियंत्रित ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे हे लक्षात घ्यायला हवं.

**घटवा वजन**

वजन कमी करण्यासाठी ॲक्युप्रेशर थेरपीचा अवलंब करणं फायदेशीर ठरतं. यात विशिष्ट केंद्रबिंदूवर दाब दिला जातो. या प्रेशरमुळे भुकेवर नियंत्रण मिळवणं शक्य होतं सहाजिकच वजन कमी होण्यास मदत होते. यासाठी सर्वप्रथम कानासमोरील बिंदूपाशी म्हणजेच इयर कॅनलसमोरील मांसल भागावर तीन मिनिटे दाब द्या. नियमितपणे हा उपाय योजल्यास भूक नियंत्रित होते. नडगीच्या मागच्या बाजूला हाडाचा भाग संपतो तिथे अंगठा आणि पहिल्या बोटाच्या साह्याने दाब द्यावा. एक मिनिटभर हा दाब पडायला हवा. या उपायाने पचनक्रिया सुधारते आणि वाढत्या वजनावर नियंत्रण मिळवणं शक्य होतं. * दोन्ही हातांच्या अंगठ्याजवळ दोन मिनिटं दाब दिल्यास वजन कमी होण्यास मदत होते. हीच क्रिया पायांजवळही करता येते.

* नाभीच्या जवळ दोन्ही बाजूंना दोन बोटांनी एक मिनिटांसाठी दाब द्यावा. यामुळेही पचनक्रिया सुधारण्यास मदत होते.

## मोबाईल उशाला... कॅन्सरचा धोका जीवाला!

रात्री झोपताना मोबाईल हातात घेऊन स्क्रोलिंग करायचं, मस्त रील्स बघायचे आणि डोळे मिटायला लागलेच की, फोन उशाच्या बाजूला ठेवून तसंच झोपायचं. ही सवय आता कॉमन झाली आहे. मोबाईल बघितल्याशिवाय झोपच लागत नाही, अशी अवस्था अनेकांची झाली आहे;पण तुमची हीच सवय कॅन्सरचा धोका वाढवू शकतो.

कॅन्सर या आजाराचे नाव जरी काढले, तरी अनेकांना धडकी भरते. बाकी कोणतेही आजार चालतील; पण 'कॅन्सर नको रे बाबा!' अशी अनेकांची अवस्था असते. परंतु तुमची झोपण्यापूर्वीची ही एक चूक तुम्हाला महागात पडू शकते. मोबाईल उशाशी ठेवून झोपणे हे धोक्याचे आहे. फोनमधून निघणाऱ्या रेडिएशनमुळे आरोग्यावर परिणाम होतो आणि कॅन्सर, तसेच ब्रेन ट्युमर यांसारख्या भयानक आजाराची लागण होते.



लक्षात घ्या

रात्री मोबाईल वापरून झाल्यानंतर तो उशाजवळ किंवा बेडवरच ठेवण्याची अनेकांना सवय असते. फोन जवळ ठेवला, की रात्री नोटिफिकेशन पाहण्यापासून ते 'सोशल मीडिया'वर रात्रभर ॲक्टिव्ह राहणे हे सगळ सुरूच असतं. यामुळे कॅन्सर बळावतो तसेच ब्रेन ट्युमरचा देखील धोका वाढण्याची शक्यता असते. रात्रीच्या वेळेस फोनमधून मोठ्या प्रमाणात 'इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन' निघतात. ज्याचा परिणाम झोपेवर होतो. मोबाईलमधून निघणाऱ्या या 'ब्ल्यू इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशन'मुळे मेंदू हायपरॲक्टिव्ह राहतो. त्यामुळे लवकर झोप येत नाही आणि झोपेची वाट लागते याचा संपूर्ण परिणाम आरोग्यावर होतो. कॅन्सरपासून वाचण्यासाठी काय करावे? डॉक्टरांनी रात्री झोपण्यापूर्वी फोनपासून अंतर ठेवण्याचा सल्ला दिला आहे. झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी फोन वापरणे बंद करा. त्याऐवजी पुस्तक वाचणे, कुटुंबाशी किंवा मित्रांशी गप्पा मारणे, मुलांसोबत खेळणे, झोपण्यापूर्वी मोकळ्या हवेत फेरफटका मारून येणे यासारख्या गोष्टी करू शकता.

## क्षयरोगावर एआयचा 'डोस'

क्षयरोगाच्या (टीबी) संशयित रुग्णांची लवकर ओळख, निदान आणि उपचार सुरू करण्यासाठी राजस्थानच्या सीकर जिल्ह्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला जात आहे. खोकल्याच्या आवाजातील सूक्ष्म संकेत ओळखण्याबरोबरच एखाद्या भागातील सामाजिक व लोकसंख्याशास्त्रीय वैशिष्ट्यांच्या आधारे क्षयरोगाचा अधिक धोका असलेल्या समूहांचीही 'एआय'च्या माध्यमातून ओळख पटवली जात आहे.

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाअंतर्गत (एनटीईपी) राजस्थान सरकारने मार्चमध्ये नवी दिल्लीस्थित संस्था 'वाधवानी एआय'च्या सहकार्याने तीन 'एआय' साधने कार्यान्वित केली. त्यात 'कफ अगेन्स्ट टीबी' (कॅट), 'व्हल्नरेबिलिटी मॅपिंग फॉर टीबी' (व्हीएमटीबी) आणि 'प्रेडिक्शन ऑफ ॲडव्हर्स टीबी आऊटकम्स' (पॅटो) यांचा समावेश आहे. 'कॅट' व्यक्तीच्या खोकल्याच्या आवाजाचे विश्लेषण करून त्याला संभाव्य क्षयरुग्ण किंवा क्षयरोगाची शक्यता नसलेली व्यक्ती, अशी वर्गवारी करते. त्यानंतर संशयित रुग्णांची छातीची क्ष-किरण तपासणी किंवा अन्य आवश्यक चाचण्या केल्या जातात.

नवसंशोधन

संशयित रुग्णांची लवकर तपासणी करणे हा या प्रणालीचा महत्त्वाचा फायदा आहे. दुर्गम ग्रामीण भागात 'व्हीएमटीबी' हे 'एआय' साधन उपयुक्त ठरत आहे. जुन्या रुग्णांसह मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग असलेले रुग्ण आणि गर्भवती महिला अशा संवेदनशील गटांची माहिती पारंपरिक पद्धतीने तयार करताना काही उच्च जोखीम रुग्ण वगळले जाण्याची शक्यता असते. 'व्हीएमटीबी'च्या मदतीने उच्च जोखीम असलेली गावे निश्चित करून तेथे अधिक नियमित आरोग्य शिबिरे घेता येत आहेत. या प्रणालीमध्ये राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण, लोकसंख्याशास्त्रीय व आरोग्य सर्वेक्षण तसेच 'युरोपियन स्पेस एजन्सी'च्या माहितीसह भौगोलिक व लोकसंख्याविषयक माहितीचा वापर केला जातो. रात्रीची प्रकाशमानता, जमिनीचा वापर, प्रदूषण आणि गावाचा सापेक्ष संपत्ती निर्देशांक यांसारख्या घटकांच्या आधारे क्षयरोगाचा धोका असलेल्या भागांना प्राधान्य दिले जाते. 'पॅटो' हे साधन क्षयरुग्णांमध्ये उपचार अर्धवट सोडण्याचा किंवा उपचारादरम्यान मृत्यूचा धोका ओळखते. त्यामुळे अशा रुग्णांचा अधिक बारकाईने पाठपुरावा, समुपदेशन, पोषणाची मदत आणि उपचारांच्या दुष्परिणामांवर लक्ष ठेवता येते.

## कमी झोपेमुळे अकाली वृद्धत्व

निरोगी राहण्यासाठी सकस आहार आणि नियमित व्यायाम जितके महत्त्वाचे आहेत, तितकीच शरीराला पुरेशी झोप मिळणेही आवश्यक आहे. मात्र, कामाचा वाढता ताण, बदलती जीवनशैली आणि रात्री उशिरापर्यंत जागण्याच्या सवयीमुळे अनेकांना पुरेशी झोप मिळत नाही. याचा परिणाम केवळ दुसऱ्या दिवशी जाणवणारा थकवा किंवा चिडचिड यापुरता मर्यादित राहत नाही, तर दीर्घकाळ अपुरी झोप घेतल्यास शरीरावर आणि पेशींवरही परिणाम होऊ शकतो. काही संशोधनांमध्ये झोपेची कमतरता आणि जैविक वृद्धत्वाशी संबंधित प्रक्रियांमध्ये संबंध आढळून आला आहे.

'रात्री एक-दोन वाजता झोपतो आणि सकाळी सहा-सात वाजता उठतो,' असे अनेकजण सहज सांगतात. कामाचा ताण, मोबाईलचा अतिवापर, बदललेल्या कामाच्या वेळा आणि रात्री उशिरापर्यंत जागण्यामुळे झोपेचा कालावधी कमी होतो. मात्र, नियमितपणे अपुरी झोप घेणे आरोग्यासाठी योग्य नाही. शरीराला विश्रांती मिळण्यासोबतच झोपेच्या काळात अनेक महत्त्वाच्या जैविक प्रक्रिया सुरू असतात. त्यामुळे वयानुसार आवश्यक तेवढी झोप घेणे आरोग्यासाठी महत्त्वाचे ठरते.

जाणून घ्या

## 'व्हिटॅमिन-बी'ची कमी महिलांमध्ये सर्वाधिक

आजच्या या स्पर्धेच्या युगाच टिकून राहायचं असेल, तर कामाला अधिक महत्त्व देण्याची गरज भासतेच, पण काम तर महत्त्वाचं आहेच. त्यासाठी आरोग्य सर्वात जास्त महत्त्वाचं आहे. पुरुषांच्या तुलनेत कामाच्या व्यापामुळे महिला स्वत:कडे लक्ष देणं पूर्णपणे विसरून जातात. त्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. अशा परिस्थितीत काही लक्षणं आहेत. त्याकडे कधीच दुर्लक्ष करु नका. सांगायचं झालं, तर अनेक लोक सततचा थकवा, हात-पायांना मुंग्या येणे, जिभेतील बदल, काहीही नीट लक्षात न राहणे किंवा चालताना तोल जाणे यांसारख्या लक्षणांकडे सामान्य समस्या म्हणून दुर्लक्ष करतात; परंतु यापैकी काही लक्षणे व्हिटॅमिन बी-१२ च्या कमतरतेची धोक्याची चिन्हे असू शकतात. त्यामुळे अशा लक्षणांकडे बिलकूल दुर्लक्ष करू नका.

बी-१२च्या कमतरतेमुळे शरीरात दिसू शकणारी काही महत्त्वाची लक्षणं त्यांनी सांगितली आहेत. सर्वात महत्त्वाचं म्हणजे, बी-१२च्या कमतरतेमुळे ट्रॉफिक ग्लोसायटिस होऊ शकतो. या स्थितीत जीभ नेहमीपेक्षा अधिक गुळगुळीत, चमकदार किंवा लालसर दिसू शकते. काही लोकांना जिभेमध्ये वेदना किंवा जळजळदेखील जाणवू शकते. त्यामुळे बिलकूल दुर्लक्ष करू नका. बी-१२च्या कमतरतेमुळे लाल रक्तपेशींच्या निर्मितीमध्ये अडथळा येऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये, यामुळे 'मेगालोब्लास्टिक ॲनिमिया' होऊ शकतो. जेव्हा शरीराच्या उतींना ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो, तेव्हा थकवा, अशक्तपणा, चक्कर येणे, धाप लागणे किंवा व्यायाम करण्याची क्षमता कमी होणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात.

मज्जातंतूंच्या आरोग्यासाठी बी-१२ खूप महत्त्वाचं आहे. त्याच्या कमतरतेमुळे मज्जातंतूंना इजा होऊ शकते. त्यामुळे हात आणि पायांमध्ये मुंग्या येणे, जळजळ होणे, बधिरता येणे किंवा संवेदना नाहीशी होणं अशी लक्षणे दिसू शकतात. काही लोकांमध्ये, ही लक्षणे प्रथम पायांमध्ये दिसू शकतात आणि नंतर शरीराच्या वरच्या भागापर्यंत पसरू शकतात. जर बी-१२ची कमतरता दीर्घकाळ टिकून राहिली, तर त्याचा परिणाम पाठीच्या कण्यातील काही विशिष्ट चेतामार्गांवर होऊ शकतो, जे तुम्हाला तुमच्या शरीराची स्थिती जाणण्यास मदत करतात. यामुळे चालताना अडखळणे, वारंवार ठेच लागणे, अंधारात चालण्यास अडचण येणे किंवा पाय रुंद पसरून काळजीपूर्वक चालावे लागणे यांसारख्या समस्या उद्‌भवू शकतात.

काळजी घ्या

### नवसंशोधन

## लाळेची किफायतशीर चाचणी



कर्करोगाच्या निदानाची प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि खर्चिक असते. पण शास्त्रज्ञांच्या प्रयत्नांमुळे कर्करोगाचं निदान किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीने होऊ शकतं. या अत्यंत किफायतशीर अशा लाळेच्या चाचणीमुळे ह्युमन पॅपिलोमा १६ विषाणूचं निदान करता येतं. हा विषाणू घसा, तोंडाच्या कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. या चाचणीमुळे तोंडाच्या तसंच घशाच्या कॅन्सरचं वेळेत निदान होऊ शकतं. अमेरिकेतल्या ड्यूक विद्यापीठातल्या शास्त्रज्ञांनी याबाबत संशोधन केलं आहे. हे तंत्रज्ञान इतर काही विकारांच्या निदानासाठी उपयुक्त ठरू शकतं, असंही शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

### दंतारोग्य

## ओव्याने दूर करा तोंडाच्या समस्या

हिरड्या सुजणं, तोंडाची दुर्गंधी या मौखिक आरोग्याशी संबंधित सर्वसाधारण समस्या आहेत. तोंड स्वच्छ ठेवलं नाही तर दातांमध्ये साठलेलं अन्न कुजून दुर्गंध येऊ लागतो. ही समस्या दूर करण्यासाठी बरेच उपाय केले जातात. ओव्याच्या पाण्याने तोंडाची दुर्गंधी दूर होऊ शकते. यासाठी थोड्या पाण्यात ओवा घालून उकळून घ्या. या पाण्याने चूळ भरल्यामुळे तोंडाच्या दुर्गंधीची समस्या कमी होऊ शकते. हिरड्यांमधून रक्त येत असेल तर ओव्याच्या तेलाचे काही थेंब गरम पाण्यात घालून या पाण्याने चूळ भरल्यामुळे हिरड्यांमधलं रक्त थांबू शकतं.

### जपणूक त्वचेची

## त्वचेवर दिसतात परिणाम

शरीरात एखाद्या पोषक घटकाची कमतरता असल्यास त्याची लक्षणं दिसू लागतात. त्वचा पांढरी पडणं, त्वचेवर चट्टे पडणं, पिंपल्स येणं ही एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेची लक्षणं असू शकतात. त्वचा निस्तेज, पांढरट दिसणं हे बी १२ या जीवनसत्त्वाच्या कमतरतेचं लक्षण असू शकतं. त्वचेवर पुरळ किंवा पिंपल्स येत असतील तर हे 'अ' आणि 'ई' या जीवनसत्त्वांच्या कमतरतेचं लक्षण ठरू शकतं. त्यामुळे त्वचेच्या समस्या असतील तर या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची तपासणी नक्की करून घ्या.



### आजीबाईचा बटवा

## नैराश्यावर प्रभावी उपाय



सध्या अनेकांना नैराश्याने ग्रासल्याचं पहायला मिळतं. नैराश्याच्या या समस्येवर बरेच उपचार करावे लागतात. पण काही घरगुती उपायांनी तुम्हाला बरं वाटू शकतं. हळद आणि लिंबाच्या मिश्रणामुळे नैराश्य तसंच इतर मानसिक आजारांमध्ये बरं वाटू शकतं. यासाठी एका भांड्यात चार कप पाणी घ्या. त्यात एका लिंबाचा रस घाला. यात दोन चमचे हळद आणि चार चमचे मध घाला. हे सर्व घटक नीट मिसळून घ्या. दिवसातून दोन वेळा हे पाणी प्या. यामुळे लाभ होतील. हळदीतल्या पोषक घटकांमुळे नैराश्याची तीव्रता कमी होऊ शकते.

# स्तनाच्या कर्करोगाविरुद्ध लढा

## वेळेवर निदान, सकारात्मकता आणि आशेचा नवा किरण!

संकुचित विचारांनी नव्हे, तर खंबीर आत्मविश्वासाने, कुटुंबाच्या साथीने आणि योग्य माहितीने प्रत्येक संकटावर मात करता येते. स्तनाचा कर्करोग हा जीवनाचा शेवट नाही, तर वेळेवर निदान आणि अचूक उपचारांनी त्यावर मात करून पुन्हा एकदा आनंदी व निरोगी आयुष्य जगण्याची नवी संधी आहे.

ऑक्टोबर महिना हा जगभरात 'स्तन कर्करोग जागरूकता महिना' म्हणून साजरा केला जातो. या जनजागृती अभियानाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाविषयी असणारी भीती व गैरसमज दूर करणे, वेळेवर निदानाचे महत्त्व पटवून देणे आणि रुग्णांना मानसिक व वैद्यकीय पाठबळ देणे हा आहे.

भारतीय महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. महिलांमध्ये उद्भवणाऱ्या एकूण कर्करोगांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण तब्बल ३२ टक्के इतके आहे. आकडेवारीनुसार, ३० महिलांमागे एका महिलेला स्तनाचा कर्करोग होण्याची शक्यता असते. हा आजार गंभीर असला, तरी सुरुवातीच्या टप्प्यात निदान झाल्यास तो शंभर टक्के बरा होऊ शकतो. वेळेत निदान झाल्यास उपचार सोपे, कमी वेदनादायक आणि कमी खर्चाचे होतात. आजार बरा झाल्यानंतर महिला इतर सर्व स्त्रियांप्रमाणेच सामान्य, आनंदी आणि यशस्वी आयुष्य जगू शकतात.

स्वतःची तपासणी (Self Breast Examination) का आणि कशी करावी?

कोणत्याही मोठ्या आजारावर मात करण्याची पहिली पायरी म्हणजे वेळेवर निदान (Early Detection). हा आजार कोणत्याही महिलेला होऊ शकतो, त्यामुळे वयाच्या २० वर्षांवरील सर्व महिलांनी 'सेल्फ ब्रेस्ट एक्झॉमिनेशन' (स्तनाची स्वतः तपासणी) सवयीचा भाग बनवणे आवश्यक आहे.

कधी करावी? मासिक पाळी संपल्यानंतरच्या सातव्या दिवशी ही तपासणी करावी. ज्या महिलांची रजोनिवृत्ती (Menopause) झाली आहे, त्यांनी महिन्याच्या एका ठराविक तारखेला स्वतः तपासणी करावी.

तपासणीत काय पाहावे?

* स्तनात किंवा काखेमध्ये कोणतीही लहान-मोठी गाठ, ताठरता किंवा गोळा जाणवणे.
* स्तनावर सूज, बारीक खळगा पडणे किंवा संत्रातळीसारखा (खाच असलेला) पोत तयार होणे.
* स्तनाग्रातून (Nipple) रक्त किंवा पांढरट स्राव वाहणे.
* स्तनांच्या त्वचेचा रंग अचानक बदलणे किंवा अल्सर्स/फुगवटा येणे.
* मॅमोग्राफी (Mammography) : चाळीशी ओलांडलेल्या महिलांनी वर्षातून एकदा तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने मॅमोग्राम चाचणी करून घेणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे अगदी सूक्ष्म गाठही सुरुवातीलाच लक्षात येते.

कर्करोगाची प्रमुख कारणे आणि लक्षणे

प्रमुख कारणे :

* आनुवंशिकता / कौटुंबिक इतिहास : कुटुंबात आधी आई, बहीण किंवा जवळच्या नातेवाईकाला कर्करोग असल्यास धोका वाढतो.
* मासिक पाळी व रजोनिवृत्ती : वयाच्या १२ व्या वर्षापूर्वी पाळी सुरू होणे किंवा ५५ व्या वर्षांनंतर उशिरा रजोनिवृत्ती होणे.
* जीवनशैली व इतर : लठ्ठपणा, अतिचरबीयुक्त आहार, व्यसनाधीनता आणि कौटुंबिक नियोजन औषधांचा अतिरेक.

प्रमुख लक्षणे :

* स्तनात किंवा काखेत गाठ जाणवणे आणि सतत वेदना होणे.
* स्तनाच्या आकारात किंवा रंगात अचानक लक्षणीय बदल होणे.
* सतत थकवा जाणवणे आणि अचानक कारण नसताना वजन कमी होणे.
* मनाची उमेद, सकारात्मकता आणि स्त्रीशक्तीचा खंबीरपणा

* जेव्हा एखाद्या महिलेला स्तनाच्या कर्करोगाचे निदान होते, तेव्हा सुरुवातीला मानसिक धक्का बसणे अत्यंत स्वाभाविक असते. परंतु, निदान म्हणजे आयुष्य संपले नव्हे, तर हा एका नवीन संघर्षाची सुरुवात आणि विजयाचा आरंभ आहे.

या कठीण काळात कुटुंबाची साथ, डॉक्टरांचे समुपदेशन आणि स्वतःवरचा अगाध आत्मविश्वास हीच खरी औषधी ठरते.

* आजच्या आधुनिक युगात वैद्यकीय विज्ञानाने आणि उपचारांनी प्रचंड प्रगती केली आहे. जेव्हा महिला मनाशी खूणगाठ बांधतात की, मी यातून पूर्ण बरी होऊन माझ्या कुटुंबासाठी हसमुख चेहरा घेऊन परतणार आहे, तेव्हा अर्धी लढाई ती तिथेच जिंकलेली असते. तुमची इच्छाशक्ती आणि सकारात्मक विचार हे जगातील कोणत्याही औषधापेक्षा अधिक शक्तिशाली असतात.

उपचारांमध्ये होमिओपॅथीची भूमिका –

स्तनाच्या कर्करोगाच्या उपचारांमध्ये शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी यांचा समावेश असतो. या मुख्य उपचारांसोबत होमिओपॅथी अत्यंत प्रभावी, संवेदनशील आणि भूमिका बजावते.

१. शारीरिक ताण व दुष्परिणाम कमी करणे : मुख्य उपचारांदरम्यान शरीराला होणारा त्रास, थकवा आणि अशक्तपणा कमी करून शरीराची ऊर्जा टिकवून ठेवण्यास होमिओपॅथिक औषधे मदत करतात.

२. रोगप्रतिकारक शक्ती बळकट करणे : होमिओपॅथी शरीराची नैसर्गिक रोगांशी लढण्याची क्षमता वाढवते, ज्यामुळे रुग्ण प्रत्येक टप्प्याला अधिक धैर्याने सामोरे जाऊ शकतो.

३. मानसिक व भावनिक पाठबळ : निदानानंतर मनामध्ये निर्माण होणारी भीती, नैराश्य, चिंता आणि हुरहूर दूर करण्यासाठी व्यक्तीनिष्ठ होमिओपॅथिक औषधे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे रुग्णाला आतून शांत आणि खंबीर बनवते.

४. जीवनमान दर्जा सुधारणे : उपचारांच्या प्रवासात शरीराचे नैसर्गिक संतुलन राखत रुग्णाला आनंदी व तजेलदार ठेवण्याचे काम होमिओपॅथी करते.

५. प्रगत व शेवटच्या टप्प्यातील आधार (Pain Management) – कॅन्सरच्या प्रगत किंवा शेवट्च्या टप्प्यातील रुग्णांमधील तीव्र वेदना कमी करून, त्यांचे परावलंबित्व कमी करणे आणि त्यांना एक सुसहय, वेदनामुक्त आयुष्य जगण्यास मदत करणे हे आमचे मुख्य ध्येय आहे.

एक आश्वासक संदेश : कॅन्सर हरणार, आपण जिंकणार!

कॅन्सर हा आजार शरीराला हरवू शकतो, पण तुमच्या मनातील जगण्याची जिद्द आणि आत्मविश्वासाला तो कधीही पराभूत करू शकत नाही. आज स्तनाच्या कर्करोगावर यशस्वी मात करून हजारो स्त्रिया अत्यंत दिमाखात, अभिमानाने आणि आनंदाने आपले कुटुंब, करिअर आणि समाजजीवन पूर्ववत जगत आहेत. त्यांचा हाच प्रवास आपल्यासाठी एक मोठा प्रेरणास्रोत आहे.

स्त्रियांनो, स्वतःवर प्रेम करा. तुमच्या शरीराने तुम्हाला दिलेल्या छोट्या-मोठ्या संकेतांकडे दुर्लक्ष करू नका. तुमचे आरोग्य हे केवळ तुमचे नसून, तुमच्या संपूर्ण कुटुंबाचा आणि विश्वासाचा पाया आहे. थोडीशी सतर्कता, मनाची अफाट सकारात्मकता आणि योग्य उपचारांच्या जोरावर आपण आरोग्याची ही लढाई निश्चितच जिंकू!

– **डॉ. सचिन बोरा** (होमिओपॅथी तज्ञ)
डॉ. बोरा कॅन्सर क्लिनिक, अंबर प्लाझा,
माळीवाडा बस स्टॅण्ड समोर, अहिल्यानगर.
अधिक माहिती साठी संपर्क ९९२१६४६५८८
टीप :- (आम्ही कोणताही अवास्तव दावा करत नाही, तर रुग्णाचे जीवनमान (Quality of Life) उंचावण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो.)

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी आधुनिक स्वच्छता मशीन गाडीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले होते. त्याची पाहणी आ. संग्राम जगताप, महापौर ज्योती गाडे यांनी केली. (छायाचित्र – लहू दळवी)

# आधुनिक स्वच्छता मशीनमुळे शहरातील ४० किलोमीटर रस्त्यांची ८ तासांत स्वच्छता

### आ. संग्राम जगताप व महापौर ज्योती गाडे यांच्याकडून प्रात्यक्षिकाची पाहणी

नगर – नगर शहरात विविध क्षेत्रांमध्ये विकासकामे सुरू असून शहराचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात आपणही एक पाऊल पुढे टाकणे आवश्यक आहे. महानगरपालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असताना शहराचा विस्तार मात्र वेगाने वाढत आहे. त्यामुळे संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वच्छता यंत्रणा अधिक सक्षम करणे गरजेचे आहे. या मशीनच्या माध्यमातून कमी वेळेत रस्त्यांची स्वच्छता करता येणार असून वेळेची बचत होण्यासोबतच संपूर्ण शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मदत होईल, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

महानगरपालिकेच्या वतीने शहरातील रस्ते स्वच्छतेसाठी आधुनिक स्वच्छता मशीन गाडीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आल होते. पुणे येथील चॅलेंजर स्वीपर कंपनीच्या माध्यमातून पत्रकार चौक येथे हे प्रात्यक्षिक घेण्यात आले. आ. जगताप व महापौर ज्योती गाडे यांनी प्रात्यक्षिकाची पाहणी करून मशीनच्या कार्यक्षमतेची माहिती घेतली. त्यावेळी आ. जगताप बोलत होते.

आ. जगताप म्हणाले की, गणेश भोसले, संपत बारस्कर आणि उपमहापौर धनंजय जाधव हे वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनासाठी काम करत आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यावर दुष्काळाचे मोठे सावट असल्याने वृक्षारोपणाबरोबरच झाडांचे संवर्धन करण्यासाठी नागरिकांच्या सहभागातून लोकचळवळ उभी करणे गरजेचे आहे.

या मशीनच्या माध्यमातून आठ तासांत सुमारे ४० किलोमीटर रस्त्यांची स्वच्छता करता येते. शहरातील रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी अशा आधुनिक यंत्रणेचा उपयोग होऊ शकतो. याच अनुषंगाने आज रस्ते स्वच्छता मशीनचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात आले असून त्याची पाहणी करण्यात आली, असे महापौर गाडे यांनी सांगितले. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती वर्षा सानप, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, प्रकाश भागानगरे, रेवन्नाथ पवार, जितू गंभीर, बाळासाहेब पवार, अमोल गाडे, रोहन सानप, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, प्रा. माणिकराव विधाते, महेश लोंढे, सचिन लोटके आदी उपस्थित होते.

### सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी

महापौर गाडे म्हणाल्या, आ. जगताप यांच्या माध्यमातून शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे झाली आहेत. हे रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित सफाई करणे आवश्यक आहे. मात्र, महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे संपूर्ण शहर स्वच्छ ठेवताना अडचणी निर्माण होतात. अशा परिस्थितीत आधुनिक स्वच्छता मशीनचा वापर केल्यास कमी वेळेत अधिक रस्त्यांची स्वच्छता करणे शक्य होईल. मात्र, शहराच्या वाढत्या विस्ताराचा विचार करता यापेक्षाही अधिक सक्षम स्वच्छता मशीनची आवश्यकता आहे. त्यामुळे पुन्हा एकदा प्रात्यक्षिकाची पाहणी करून योग्य मशीनबाबत निर्णय घेतला जाईल. शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे झाली आहेत. विकासकामांसोबत पर्यावरणाच्या दृष्टिकोनातूनही विविध उपक्रम सुरू आहेत.

# समृद्ध संत परंपरेचे आपण सर्वजण पाईक : महंत रामगिरी महाराज

### संत समेलनाचे भक्तीमय वातावरणात वाजले सूप !; संत साहित्य, संतविचारांच्या परंपरेचा दोन दिवस जागर

संत साहित्य संमेलनाच्या सांगता समारंभात मार्गदर्शन करताना महंत रामगिरी महाराज. समवेत प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, मसापचे अध्यक्ष योगेश सोमण, पं. डॉ. विकास कशाळकर, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे, स्वागताध्यक्ष सतीश मुळे, डॉ. दिलीप धनेश्वर, प्राचार्य सुनील पंडित, संजय खेले, राजकुमार जोशी, दत्ता भालेराव आदी.

नगर – संत ज्ञानेश्वर महाराज यांनी नाथ परंपरेतून वारकरी संप्रदायाला वैचारिक अधिष्ठान देत ज्ञान आणि तत्त्वज्ञानाचा अमूल्य ठेवा समाजासमोर मांडला. ते खऱ्या अर्थाने ज्ञानराज होते. त्यांचे संपूर्ण वाङ्मय आत्मसुखाची अनुभूती देणारे असून, मानवी अंतःकरण शुद्ध करून आत्मस्वरूपाचा साक्षात्कार घडविण्याची विद्या त्यातून प्रकट होते. 'पसायदाना'तून माऊलींनी संपूर्ण विश्वाला दिव्य आणि अद्भुत आहे. या समृद्ध वारकरी आणि संत परंपरेचे आपण सर्वजण पाईक आहोत, असे प्रतिपादन सराला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी केले.

राज्य शासनाच्या मराठी भाषा विभाग आणि साहित्य व संस्कृती मंडळाच्या आर्थिक सहकार्याने तसेच नगरच्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय संत साहित्य संमेलनाच्या सांगता समारंभात महंत रामगिरी महाराजांनी मार्गदर्शन केले. संत साहित्य, संतविचारांच्या परंपरेचा जागर घडविणाऱ्या या संमेलनाची सांगता भक्तिमय वातावरणात झाली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत संघचालक नानासाहेब जाधव, ज्येष्ठ संगीत तज्ज्ञ पं. डॉ. विकास कशाळकर, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ रंगकर्मी योगेश सोमण, संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल सहस्रबुद्धे उपस्थित होते. तसेच संमेलनाचे स्वागताध्यक्ष सतीश मुळे, कार्याध्यक्ष डॉ. दिलीप धनेश्वर, सहस्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील पंडित, सचिव संजय खेले, उद्योजक राजकुमार जोशी, हभप उमेश बागडे, हभप राजेंद्र नवले, दत्तात्रय भालेराव, गजेंद्र गाडगीळ यांच्यासह संमेलनाचे पदाधिकारी, हभप महाराज मंडळी, साहित्यप्रेमी आणि विविध क्षेत्रांतील नागरिक उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्ह्यातील संतपरंपरेचा समृद्ध वारसा, संत साहित्याचे आध्यात्मिक महत्त्व आणि वारकरी संप्रदायाची शिकवण यांचा परिचय या दोन दिवसांच्या संमेलनातून रसिकांना झाला. संतविचारांच्या चिंतनासोबतच विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी संमेलनात रंगत आणली. जिल्ह्यातील संत-महंतांच्या उपस्थितीने संमेलनाला आध्यात्मिक उंची प्राप्त झाली. भक्तिमय वातावरणात संत साहित्य संमेलनाची उत्साहपूर्ण सांगता झाली. यावेळी जिल्ह्यातील विविध महाराजांना संत पाईक पुरस्काराने व सांकृतिक कार्य पुरस्काराने गौरवण्यात आले.

नानासाहेब जाधव म्हणाले, जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलन हे राज्यात पहिल्यांदाच होत आहे. प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे यांनी चांगला पुढाकार घेऊन हे संमेलन यशस्वी केले आहे. उत्कृष्ट व बारकाईने केलेल्या नियोजनामुळे हे संमेलन यशस्वी होऊन नवा आदर्श निर्माण झाला आहे. श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाच्या सर्व साधकांनी प्राचार्य अनिल सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली निर्मन केलेल्या श्री ज्ञानेश्वरी चिंतन खंड १- तत्त्वज्ञान प्रबोध व खंड २ – जीवन प्रबोध या बृहद् ग्रंथांची केलेली निर्मीती सर्वांसाठी मार्गदर्शक आहेत,

ज्येष्ठ रंगकर्मी योगेश सोमण यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनावरील 'आनंदडोह' या एकल नाट्याच्या निर्मितीची कथा व त्यांना आलेल्या चमत्कारिक अनुभवांचे कथन केले. श्रोत्यांच्या आग्रहास्तव त्यांनी आनंदडोह नाटकातील तुकाराम महाराजांच्या गाथा पाण्यात बुडवल्याच्या प्रसंगावर स्वगत सादर करून सभागृहात गंभीर वातावरण निर्माण केले. संत स्पर्श झाल्यानेच माझ्याकडून या नाटकाची निर्मिती झाल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी या संमेलनाची सांगता न म्हणता पूर्णाहुती झाल्याचे नमूद केले. पं.डॉ. विकास कशाळकर यांनी संगीताच्या अंगाने संतांचे विचार यावर भाष्य करून शुभेच्छा दिल्या.

सांगता सोहळ्याचे प्रास्ताविकात डॉ.दिलीप धनेश्वर यांनी कृतार्थ भावनेने सर्वांचे आभार मानून संमेलनातील सर्व सत्रांना व कार्यक्रमास नगरकरांनी भरभरून प्रतिसाद दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

सह स्वागताध्यक्ष प्राचार्य सुनील पंडीत यांनी स्वागत केले.

सूत्रसंचालन प्राचार्य श्रीकांत होशिंग यांनी केले तर स्वागताध्यक्ष सतीश मुळे यांनी आभार मानले. सांगता सोहळ्यात काही ग्रंथाचे प्रकाशन व संत पायिक पुरस्कारांचे वितरण झाले.

या संमेलनात हभप दळवी महाराजांच्या भागवत रसामृत या ग्रंथाचे व दत्ता भालेराव यांच्या संत ज्ञानेश्वरांचा समरस्य विचार या ग्रंथांचे प्रकाशन केले.

संमेलनात संमेलनाचे स्वागत संयोजक प्रा.डॉ.मच्छिंद्र मालुंजकर, व्यवस्था प्रमुख प्रा.डॉ.राजू रिक्कल, प्रा.मीरा पटारे, प्रा.भीमराज पटारे, सौ.उषा सहस्रबुद्धे, डॉ.स्वप्नील सहस्रबुद्धे, प्रा.डॉ.स्फूर्ती देशपांडे, सोनिया सहस्रबुद्धे, अनिल सोमणी आदींसह श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाच्या सर्व साधकांनी, संयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी साहित्य संमेलनातील सत्रांच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# रस्ता म्हणजे केवळ दळणवळणाचे साधन नसून रोजगार निर्मितीचे केंद्र

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; नवीन जिल्हाधिकारी कार्यालय रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे भूमिपूजन

नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर ज्योती गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपसभापती वर्षा सानप, गीतांजली काळे, प्रा. माणिकराव विधाते, अविनाश घुले आदी उपस्थित होते. (छायाचित्र – लहू दळवी)

नगर – छत्रपती संभाजी महामार्ग ते माऊली संकुलमार्गे मनमाड महामार्गाला जोडणाऱ्या या रस्त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील वाहतुकीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. या रस्त्याच्या विकासामुळे परिसराला सुशोभीकरणाचे स्वरूप प्राप्त होण्याबरोबरच नागरिकांना अधिक चांगल्या वाहतूक सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केला. आ. जगताप यांच्या प्रयत्नातून नवीन जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील रस्त्याच्या काँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महापौर ज्योती गाडे, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, उपसभापती वर्षा सानप, माजी उपमहापौर गीतांजली काळे, प्रा. माणिकराव विधाते, स्थायी समितीचे माजी सभापती अविनाश घुले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, अजिंक्य बोरकर, सुरेश बनसोडे, विजय गव्हाळे, नगरसेविका सुनीता फुलसौंदर, सुजाता पडोळे, सुनीता भिंगारदिवे, हरप्रीतकौर गंभीर, करण कराळे, महेश लोंढे, मोहित पंजाबी, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, रोहन सानप, सोमनाथ जाधव, सुमित लोंढे आदी उपस्थित होते.

आ. जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराच्या पुढील २० वर्षांचा विचार करून नियोजनबद्ध आणि कायमस्वरूपी विकासकामे मार्गी लावण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सावेडी उपनगरातील तारकपूर, गुलमोहर रोड आणि पाईपलाईन रोडसह पर्यायी डीपी रस्त्यांची कामे हाती घेण्यात आली आहेत. नवीन जिल्हाधिकारी कार्यालय हे संपूर्ण जिल्ह्याच्या प्रशासकीय कामकाजाचे महत्त्वाचे केंद्र आहे. जिल्हाभरातून नागरिक विविध कामांसाठी येथे येत असतात. त्यामुळे या परिसरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविणे आवश्यक होते. छत्रपती संभाजी महामार्ग ते माऊली संकुलमार्गे मनमाड महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याच्या विकासामुळे नागरिकांची वाहतुकीची गैरसोय दूर होण्यास मदत होईल.

शहरातील कॉलनी रस्त्यांपासून थेट डीपी रस्त्यांपर्यंतची बहुतांश विकासकामे मार्गी लावण्यात आली आहेत. राज्याचे मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी जिल्ह्याच्या ठिकाणी विविध बैठकांसाठी येत असतात. नवीन जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत भव्य असून, त्या इमारतीला साजेसा रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. या कामामुळे परिसर अधिक स्वच्छ, सुंदर आणि विकसित होण्यास मदत होईल. अशा पायाभूत सुविधांमधून शहराची प्रतिमा निर्माण होत असते, असे अ. जगताप यांनी सांगितले.

# वृक्षतोडीविरोधात अहिल्यानगरमध्ये भीमाशंकर सत्याग्रह जारी

### पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसदेची राज्यव्यापी अभियानाची घोषणा

नगर – भीमाशंकर-कर्जत परिसरातील जंगलांचे संरक्षण करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोडीला विरोध करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्या वतीने भीमाशंकर सत्याग्रह या राज्यव्यापी अहिंसक अभियानाची घोषणा करण्यात आली आहे. जागतिक तापमानवाढ, संभाव्य एल निनोचा प्रभाव, पाणीटंचाई आणि पर्यावरणीय असमतोलाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक जंगलांचे संरक्षण हा केवळ स्थानिक प्रश्न नसून संपूर्ण समाजाच्या भवितव्याशी संबंधित विषय असल्याची भूमिका संघटनांनी मांडली आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या वनसंरक्षणाच्या लढ्याला महाराष्ट्रभरातील नागरिकांच्या सहभागाची जोड देण्यात येणार असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईनचे अध्यक्ष कारभारी गवळी यांनी दिली.

कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवरच्या ३ हजार मेगावॅट क्षमतेच्या सायडोंगर १ पंप्ड स्टोरेज प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वनजमीन वळविण्याच्या आणि ३२ हजार ४९० झाडे तोडण्याच्या परवानगीबाबत वृत्ते प्रसिद्ध झाली आहेत. या वृक्षतोडीच्या मंजुरीमुळे परिसरातील वनसंपत्ती, जैवविविधता आणि जलस्रोतांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांविषयी चिंता व्यक्त केली जात आहे. मात्र, वृक्षतोडीसाठी मंजूर झालेली झाडांची संख्या आणि प्रत्यक्षात तोडण्यात आलेल्या झाडांची संख्या यांत फरक असल्याचे संघटनांनी स्पष्ट केले आहे. स्थानिक ग्रामस्थांनी विरोध केल्यानंतर वृक्षतोड थांबविण्यात आल्याची वृत्ते समोर आली असली, तरी ही स्थगिती नेमकी किती काळासाठी आहे आणि भविष्यात वृक्षतोड पुन्हा सुरू होणार आहे का, याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

स्थानिक ग्रामसंघर्ष समित्या, पर्यावरणविषयक संस्था, शेतकरी, विद्यार्थी आणि पर्यावरणाबाबत जागरूक असलेल्या नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अहिंसक मार्गाने लोकमत संघटित करून वनसंरक्षणाच्या प्रश्नाला राज्यव्यापी स्वरूप देण्याचा या अभियानाचा उद्देश आहे. वनसंपत्तीचे संरक्षण, जलसुरक्षा आणि भावी पिढ्यांचा सुरक्षित पर्यावरणात जगण्याचा अधिकार या मुद्द्यांना केंद्रस्थानी ठेवून भीमाशंकर सत्याग्रह पुढे नेण्यात येणार असल्याचे संघटनांनी सांगितले.

जंगल वाचवा, पाणी वाचवा, भविष्य वाचवा! हा संदेश महाराष्ट्रातील प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन संघटनेने केले आहे. या अभियानासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

# आयएमएस-सीडसी दिवाळी शॉपिंग फेस्टिव्हलचे उद्‌घाटन

## महिला उद्योजिकांनी संधींचा लाभ घेत व्यवसाय वाढवावा : उद्योजक नरेंद्र फिरोदिया

आयएमएसच्या स्कील एनहान्समेंटण्ड एंटरप्रीन्यूरशीप डेव्हलपमेंट सेंटर (सीडसी) आयोजित 'दिवाळी शॉपिंग फेस्टिव्हल २०२६' चे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते गुलमोहर रोडवरील आम्रपाली गार्डन येथे झाले.

नगर – महिला उद्योजिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन आणि विक्री करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी अनबॉक्सिंग उपक्रमाच्या माध्यमातून सर्व महिला उद्योजिकांना एकत्रितपणे व्यवसायाची संधी उपलब्ध करून दिली. त्यांनी भविष्यातही आयएमएस–सीडसीच्या महिला उद्योजकता विकासाच्या विविध उपक्रमांना सहकार्य करण्याची घोषणा केली. महिला उद्योजिकांनी अशा संधींचा लाभ घेऊन आपल्या व्यवसायाचा विस्तार करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

आयएमएसच्या स्कील एनहान्समेंटण्ड एंटरप्रीन्यूरशीप डेव्हलपमेंट सेंटर (सीडसी) आयोजित 'दिवाळी शॉपिंग फेस्टिव्हल २०२६' चे उद्घाटन नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते गुलमोहर रोडवरील आम्रपाली गार्डन येथे झाले. नरेंद्र फिरोदिया यांनी प्रदर्शनातील विविध स्टॉल्सना भेट देऊन महिला उद्योजिकांशी संवाद साधला व त्यांच्या उत्पादनांचे कौतुक केले.

कार्यक्रमास बी.पी.एच.ई. सोसायटीचे सचिव विशाल बार्नबस, आयएमएसच्या प्रभारी संचालिका डॉ. प्रणोती तेलोरे, संस्थेचे सल्लागार डॉ. एम. बी. मेहता, उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांची प्रमुख उपस्थिती होती.

विशाल बार्नबस यांनी सीडसीच्या महिला उद्योजकता विकासासाठी सुरू असलेल्या कार्याचे कौतुक करून सहभागी उद्योजिकांना शुभेच्छा दिल्या. डॉ. प्रणोती तेलोरे, डॉ. एम. बी. मेहता आणि डॉ. विक्रम बार्नबस यांनीही महिला उद्योजिकांना प्रोत्साहन दिले. अहिल्यानगरमधील नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला उद्योजिकांच्या व्यवसायाला हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

या प्रसंगी वैष्णवी पांढरे, श्रद्धा खांडकेकर आणि अंजली महाजन यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. व्यवसाय करताना आलेल्या अडचणी, मिळालेल्या संधी आणि अशा प्रदर्शनांमुळे उत्पादनांना मिळणारी बाजारपेठ याविषयी त्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी समन्वयक डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांनी स्वागत केले. डॉ. ऋचा तांदूळवाडकर आणि प्रा. गौरी पाटील यांनी या संपूर्ण प्रदर्शनाचे नियोजन व आयोजन करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

या प्रदर्शनात ६० हून अधिक स्टॉल्स सहभागी झाले आहेत. यामध्ये आकर्षक साड्या, ड्रेस मटेरियल, रेडिमेड ब्लाऊज, दिवाळी सजावटीच्या वस्तू, गिफ्ट आयटम्स, अगरबत्त्या, हस्तनिर्मित दागिने, मोत्यांचे व वनग्रॅम ज्वेलरी, दिवाळी फराळ तसेच विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स आहेत. विशेष म्हणजे अहिल्यानगर, श्रीरामपूर आणि लातूर येथील महिला उद्योजिकांनीही खाद्यपदार्थांचे स्टॉल्स लावले आहेत.

महिला उद्योजिकांना प्रशिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष बाजारपेठ, ग्राहकांशी संपर्क आणि व्यवसायवृद्धीच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सीडसी विविध प्रदर्शने, उद्योजकता विकास कार्यक्रम, कार्यशाळा आणि विपणनविषयक उपक्रमांच्या माध्यमातून महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देत आहे. हे विक्री प्रदर्शन १ नोव्हेंबर पर्यंत सुरू राहणार आहे. दिवाळीच्या खरेदीसाठी विविध वस्तू, आकर्षक भेटवस्तू आणि रुचकर खाद्यपदार्थांची मेजवानी नागरिकांना येथे अनुभवता येणार आहे.

दिवाळीची खरेदी करण्याबरोबरच स्थानिक महिला उद्योजिकांच्या कष्टांना आणि त्यांच्या व्यवसायाला प्रोत्साहन देण्याची ही एक उत्तम संधी आहे. त्यामुळे अहिल्यानगरकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन आयएमएस–सीडसीतर्फे करण्यात आले आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## आपण शहाणपण सोडू नये

ज्याला झोप येत नाही त्याला रात्र खूप मोठी वाटते. ज्याच्या अंगात त्राण नाही, त्याला अंगणातली शतपावलीदेखील मैलोगणती फिरल्यासारखी जेरीला आणते. ज्याला नीती, व्यवहार आणि धर्म कळत नाही, त्या मूर्खाला जीवनात मौजच नसते.

पण मूर्ख कुणाला म्हणावे ? नीतीची व्याख्या कालसापेक्ष आणि थोर व्यक्तिमतानुसार व्यवहारदेखील असा सापेक्षच आणि धर्म तर मुळातच परिवर्तनशील.

तेव्हा प्रश्न तसाच उरतो की मूर्ख कोण असतो ? सुभाषिते रचनासुद्धा ते सरळ सांगत नाहीत. सांगणाऱ्यालाच लागू पडण्याची भीती. मूर्ख कोण? याचे उत्तर, मी नाही. एवढेच. शहाणा कोण, याचे उत्तर मात्र, मी सोडून कुणीही नाही. असे बेधडक.

मूर्खाची लक्षणे सहा. गर्वाने फुगलेला, शिवराळ, वाईटच बोलत राहणारा, उलटून बोलणारा, उचित ते करणार नाही, नको तेच करेन हा हट्ट. वामन पंडितांचे भाषांतरित सुभाषित म्हणते,

प्रयत्ने वाळूचे कण रगडिता तेलहि गळे।
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिउनीहि वितळे।।
सशाचेही लाभे विपिन फिरता शृंगहि जरी ।
परंतु मूर्खाचे हृदय धरवे ना क्षणभरी ।।

येथे मूर्ख कोण ते सांगितलेले नाही, पण रगडून वाळूतून तेल काढणे, केव्हा ना केव्हा सशाचे शिंग सापडेल म्हणून रान तुडविणे, मृगजळाच्या मागे लागून तहान भागवायला मृगजळामागे पळणे, हे सगळे काय शहाणपणा करणे? या कृतीच मूर्खपणाच्या.

मूर्खाला मूर्ख म्हणणारा मूर्खच नाही का? कारण मूर्ख, मूर्ख होऊच शकत नाही. फक्त शहाणाच मूर्ख ठरू शकतो. कारण मूर्ख व्हायला आधी तो शहाणा असायला पाहिजे.

एका सुभाषित दुसऱ्या सुभाषिताला मूर्ख ठरवीत म्हणते, गुणांचा साठा अंगी असला की, त्यात एक दोष खपून जातो; हे खोटे आहे. कारण मूर्खपणा हा एक दोष तर सगळ्या गुणांनाच नष्ट करतो.

पण जो गुणी असेल, तो मूर्खपणाच कशाला करील ? गुणी मूर्खपणा करतो, असे म्हणणाराच मूर्ख ठरेल. दुसरा एक सुभाषितकार म्हणतो, जो आपली कामे सोडून दुसऱ्याची सेवा करतो, तो मूर्ख. पण दुसऱ्यासाठी खपणे हे तर संतच.

सेवा करायला जाणे हा मूर्खपणा ? स्वार्थच पाहत बसणे हा शहाणपणा ? इतरांना मूर्खपणा वाटला तरी आपण निर्भयपणे, आनंदाने जगण्याचा शहाणपणा सोडू नये. स्वतः शहाणपणाने जगले की, दुसऱ्याला मूर्ख म्हणणे कुठे उरले ? आनंदाने जगावे. दुसऱ्यालाही आनंदाने जगवावे.

– किशोर गांधी

# न्यूमा क्लिनिकतर्फे २ ते १२ नोव्हेंबरदरम्यान नगर शहरात 'मोफत श्रवण तपासणी शिबीर'

## दिव्यांगांसाठी श्रवणयंत्रावर विशेष सूट

नगर – दिवाळीनिमित्त दिव्यांगांसाठी अहिल्यानगर–मधील न्यूमा हिअरिंग एड ॲण्ड स्पीच थेरपी क्लिनिकच्या वतीने विशेष मोफत श्रवण तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजात वाढत्या ध्वनिप्रदूषणामुळे आणि वयोमानानुसार अनेकांना कमी ऐकण्याचा त्रास (श्रवणदोष) जाणवतो. अशा नागरिकांसाठी ही एक संधी ठरणार आहे. हे शिबिर २ ते १२ नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार असून, शिबिराची वेळ सकाळी १० ते संध्याकाळी ७ वाजेपर्यंत असणार आहे. न्यूमा हिअरिंग एड ॲण्ड स्पीच थेरपी क्लिनिक, ड्रिमलॅण्ड अपार्टमेंन्ट, सारस्वत बँक समोर झोपडी कॅन्टीन सावेडी रोड अहिल्यानगर या ठिकाणी होणार आहे.

शिबिरामध्ये आधुनिक श्रवण यंत्रांच्या खरेदीवर ग्राहकांसाठी ३० टक्क्यांपासून ते ५० टक्क्यांपर्यंतची सूट देण्यात येणार असून दर्जेदार व अत्याधुनिक डिजिटल श्रवण यंत्रे येथे उपलब्ध करून दिली जाणार आहेत, ज्यामुळे रुग्णांना पुन्हा स्पष्ट ऐकू येण्यास मदत होईल.

बदलत्या जीवनशैलीत कानाच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन क्लिनिकच्या वतीने करण्यात आले आहे. शिबिराचा लाभ घेण्यासाठी नाव नोंदणी आवश्यक असून नोंदणी करण्यासाठी ९३७११२१२१० या क्रमांकावर संपर्क साधावा.

# कायनेटिक इंजिनियरिंग लि. च्या वतीने कर्तृत्ववान महिलांचा १ नोव्हेंबरला नारी सन्मान शक्तीचा पुरस्काराने होणार गौरव

नगर – समाजाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान देताना आपल्या कर्तृत्वाने आपल्या कार्यातून समाजाला नवी दिशा देणाऱ्या आणि प्रेरणास्रोत ठरणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना येथील कायनेटिक इंजिनियरिंग लि. या उद्योगसमूहांच्या वतीने नारी सन्मान शक्तीचापुरस्काराने गौरवण्यात येणार असल्याची माहिती कायनेटिक चे संचालक शशिकांत गुळवे यांनी दिली.

हा पुरस्कार वितरण सोहळा १ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता कायनेटिक इंजिनियरिंग येथे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

अधिक माहिती देतांना कार्यक्रमाचे संयोजक जयंत येलुलकर म्हणाले की, महिलांच्या कर्तृत्वाला वंदन करण्यासाठी कायनेटिकने या वर्षी पासून पुरस्कार सुरू केला असून यावर्षी जिल्ह्यातील सौ. प्रतिमा हेमंत कुलकर्णी, अकोले (एकल महिलांसाठी कार्य), सौ. शिल्पा अजय धोपावकर (पत्रकारिता, समाजप्रबोधन), सौ. विद्या अविनाश तरटे (आरोग्य कार्य), दिया राजेंद्र जासूद (अपंग, राष्ट्रीय क्रीडा), सौ. वैशाली राजेश कुरापाटी (आस्थापना) यांना जाहीर झाला असून पुरस्काराचे वितरण महापौर श्रीमती ज्योतीताई गाडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. यावेळी नगरसेविका सौ. अश्विनीताई लोंढे व नगरसेविका कमलताई कोतकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

कायनेटिक उद्योग समूहाने गेल्या चाळीस वर्षांपासून अहिल्यानगरच्या उद्योगक्षेत्रात योगदान दिले असून शहरातील विविध क्षेत्रात नेहमीच सहकार्य केले असून त्यांचे उत्पादन असलेल्या लुना मोपेड च्या माध्यमातून जगाच्या औद्योगिक नकाशावर जिल्ह्याचे नाव कोरले आहे. या सोहळ्यासाठी समूहाचे व्यवस्थापकीय संचालक अजिंक्य फिरोदिया यांचे मार्गदर्शन असून महिलांच्या कार्या विषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा उपक्रम असल्याचे त्यांनी सांगितले

# प्रेम, साधेपणा आणि एकत्वाचा संदेश देत संपन्न झालेल्या निरंकारी सामूहिक विवाह सोहळ्यात १२६ जोडपी विवाहबद्ध

संत निरंकारी मिशनच्या वतीने समालखा येथे सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज व राजपिता रामितजी यांच्या पावन उपस्थितीत आयोजित सामूहिक विवाह सोहळा मध्ये १२६ जोडपी विवाहबद्ध झाले. (द्वारा – किशोर खुबचंदानी)

नगर – जिथे सद्गुरूंचा पावन आशीर्वाद, प्रेम आणि अध्यात्मिकतेचा सुंदर संगम असतो, तिथे प्रत्येक मंगलमय क्षण हा दिव्य अनुभूती बनतो. ७९ व्या निरंकारी संत समागमाच्या समारोपानंतर समालखाच्या आध्यात्मिक स्थळ मैदानावर सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या दिव्य उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला सामूहिक विवाह सोहळा याच अध्यात्मिक भावनेचे सुंदर प्रतीक ठरला. या सोहळ्यात १२६ नवविवाहित जोडपी विवाहबंधनात बांधली गेली आणि त्यांनी आपल्या नवजीवनाचा शुभारंभ केला. तसेच सद्गुरूंचा प्रेम, समर्पण आणि सुखमय वैवाहिक जीवनासाठी आशीर्वाद प्राप्त केला.

कार्यक्रमाचा शुभारंभ पारंपरिक जयमाला आणि निरंकारी सांझा–हाराने झाला. मिशनच्या प्रधान आ. राजकुमारी जी तसेच इतर कार्यकारिणी सदस्यांनी सर्व नवविवाहित जोडप्यांना सांझा–हार घालून त्यांच्या सुखमय नवजीवनासाठी मंगलकामना केल्या. त्यानंतर हिंदी भाषेत भक्तिमय निरंकारी लावांचे गायन करण्यात आले. या लावांमध्ये विश्वास, सन्मान आणि समर्पणाने परिपूर्ण गृहस्थ जीवनाच्या सुंदर शिकवणींचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी सद्गुरु माता जी आणि निरंकारी राजपिता जी यांनी नवविवाहित जोडप्यांवर पुष्पवृष्टी करून त्यांना सुख, शांती आणि आनंदमय जीवनाचा आशीर्वाद प्रदान केला.

सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी आपल्या आशीर्वचनांमध्ये नवविवाहित जोडप्यांना प्रेरणा देताना सांगितले की, विवाह हा केवळ दोन व्यक्तींमधील संबंध नसून प्रेम, आदर आणि समर्पणाने आयुष्यभर जपला जाणारा पवित्र बंध आहे. दोन्ही कुटुंबांमध्ये परस्पर सन्मान, प्रेम आणि आपुलकीची भावना वाढीस लागल्यास हा बंध आणखी दृढ होतो. एकमेकांच्या कमतरता सहजतेने स्वीकारणे, चुका झाल्यास क्षमा करणे आणि प्रत्येक परिस्थितीत नम्रतेची भावना कायम ठेवणे, हे सुखी वैवाहिक जीवनाचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत, असा संदेश सद्गुरु माता जी यांनी शेवटी दिला.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, सद्गुरु माताजींच्या परिवारातील एका सदस्याचा शुभविवाहदेखील याच सामूहिक साध्या विवाह सोहळ्यात संपन्न झाला.

विविध प्रदेश,भाषा आणि संस्कृतीतून आलेल्या या १२६ नवविवाहित जोडप्यांचे एकाच वेळी विवाहबंधनात बांधले जाणे हे एकत्व, समानता आणि वैश्विक बंधुभावाचे अनुपम उदाहरण ठरले. विविधतेमध्येही प्रेम आणि मानवतेचा समान धागा किती सुंदरपणे जोडला जाऊ शकतो, याचे दर्शन या सोहळ्यात घडले.

अहिल्यानगर भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय फ्लॉक लीडर, गाईड कॅप्टन प्राथमिक व प्रगत प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

# स्काऊट्स, गाईड्स प्रशिक्षणास जिल्ह्यातून प्रतिसाद

नगर– अहिल्यानगर भारत स्काऊट्स आणि गाईड्स जिल्हा कार्यालय व जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय फ्लॉक लीडर, गाईड कॅप्टन प्राथमिक व प्रगत प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. सात दिवस चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरास जिल्ह्यातील सर्व तालुक्यातून विविध शाळांमधून फ्लॉक प्राथमिक प्रशिक्षणासाठी २५, फ्लॉक लीडर १२, गाईड प्राथमिक प्रशिक्षणसाठी २६, गाईड प्रगत प्रशिक्षणासाठी १५ असे एकूण ७८ शिक्षिका सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त, राष्ट्रप्रेम, श्रमप्रतिष्ठा, विश्वबंधुत्व, सर्वधर्मसमभाव, स्वावलंबन, नेतृत्वगुण आणि सेवाभाव रुजवण्यासाठी स्काऊट गाईड चळवळ अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. याच उद्देशाने या प्रशिक्षण शिबिराचे स्नेहालय येथे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणास माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी भेट दिली. गायकवाड यांनी मूल्यशिक्षणाचे महत्त्व सांगताना बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. आपल्याला शिकवणाऱ्या शिक्षकांच्या आठवणी सांगत त्यांनी नारीशक्ती व काटकसरीचे महत्त्वही विशद केले. उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थ्यांचे त्यांनी कौतुक केले. तसेच जिल्हास्तरावर मेळावा आयोजित करून त्यामध्ये सर्व प्रशिक्षणार्थी व त्यांच्या विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.

प्रास्ताविक जिल्हा संघटक सोनाक्षी तेलंगे यांनी केले. या प्रशिक्षणासाठी सोनाक्षी तेलंगे, मिलन जाधव, मंजुषा जाधव, विनया राजगुरू, रंजना शिंदे, प्रभावती अवचर, संगीता गुंड व भारती कदम यांनी मार्गदर्शिका म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन मनीषा मगर यांनी केले. संगीता गुंड यांनी आभार मानले.

शिबिर यशस्वीतेसाठी जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड पुणे तथा प्रगत प्रशिक्षण शिबीर प्रमुख मिलन जाधव, गाईड प्राथमिक प्रशिक्षण शिबिर प्रमुख प्रभावती अवचर, शिबिर सहाय्यक संगीता गुंड, संगीता लांडगे, फ्लॉक लीडर प्राथमिक शिक्षण शिबिर प्रमुख मंजुषा जाधव, फ्लॉक लीडर प्रगत शिबिर प्रमुख रंजना शिंदे, शिबीर सहायक अनिता करपे, शिबिरसंचालक तथा जिल्हा संघटक सोनाक्षी तेलंगे, कनिष्ठ लिपिक संजय शिंदे, ज्ञानेश्वर, विकास रत्नापारखे आदींनी परिश्रम घेतले.

# डॉ.स्नेहल खेडकर यांना पीएच.डी. पदवी प्राप्त

नगर – येथील डॉ. स्नेहल सुभाष खेडकर यांनी भगवंत विद्यापीठ, अजमेर (राजस्थान) येथून पीएच.डी. (Ph.D.) पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे.

उच्च शिक्षणाचा प्रवास पूर्ण करताना त्यांनी घेतलेली मेहनत, सातत्य, जिद्द आणि अभ्यासातील चिकाटी यामुळे हे यश संपादन केले आहे.

या संपूर्ण संशोधन प्रवासात त्यांना गाइड प्रो. डॉ. रवी लहारे तसेच मार्गदर्शक प्रो. डॉ. संदीप हापसे आणि प्रो. डॉ. वाईद आंबेकर यांचे मार्गदर्शन, सहकार्य व प्रोत्साहन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे संशोधनाचा प्रवास अधिक सुकर झाला.

या यशाबद्दल सुभाष खेडकर, बाबासाहेब खेडकर, मंगल खेडकर, वैशाली खेडकर, मनोज खेडकर, हर्षद खेडकर, सिद्धी खेडकर, वरद आणि अनुपराज खेडकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# हॉस्पिटलसमोरून दुचाकीची चोरी

नगर – अहिल्यानगर शहरातील साईदीप हॉस्पिटलसमोर उभी केलेली होंडा कंपनीची शाईन मोटारसायकल (क्र. एम.एच. १६ सी.एम. ६६६०) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शैलेश बाळकृष्ण शिर्के (वय ३२, रा. कळमकर नगर, भारत गॅस गोडाऊनसमोर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार आंधळे करत आहेत.

# डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये आव्हानात्मक शस्त्रक्रिया

## ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून १५ किलो वजनाची अंडाशयाची गाठ यशस्वीरीत्या काढली

(विखे) डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढली.

नगर – डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटल आणि वैद्यकीय महाविद्यालय, अहिल्यानगर येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने एका ७२ वर्षीय महिलेच्या पोटातून तब्बल १५ किलो वजनाची अंडाशयाची मोठी गाठ शस्त्रक्रियेद्वारे यशस्वीरीत्या काढून वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. १७ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेली ही आव्हानात्मक शस्त्रक्रिया सुमारे तीन तास चालली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती चांगली असून तिच्या प्रकृतीत समाधानकारक सुधारणा झाली आहे.

सदर महिला रुग्णाच्या पोटामध्ये मोठ्या आकाराची गाठ तयार झाली होती. या गाठीमुळे पोटावर मोठा ताण निर्माण होऊन रुग्णाला श्वास घेण्यास, लघवी करण्यास तसेच शौचास जाण्यास त्रास होत होता. गाठीचा आकार वाढल्यामुळे रुग्णाच्या दैनंदिन जीवनावरही परिणाम होत होता. तपासणीनंतर ही अंडाशयाची गाठ असल्याचे निदर्शनास आले. गाठीचा प्रचंड आकार आणि तिची इतर अवयवांशी झालेली चिकटण ही शस्त्रक्रियेतील प्रमुख आव्हाने होती.

या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमध्ये कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. अद्वैत वैद्य व मूत्रविकार तज्ञ डॉ. दीपक गाडेकर यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. शस्त्रक्रियेदरम्यान गाठ आजूबाजूच्या इतर अवयवांना चिकटलेली असल्याने विशेष काळजी आणि कौशल्याची आवश्यकता होती. रुग्णाच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत डॉक्टरांच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने शस्त्रक्रिया पूर्ण केली आणि सुमारे १५ किलो वजनाची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली.

वृद्ध वयातील रुग्ण, गाठीचा मोठा आकार आणि इतर अवयवांशी असलेली चिकटण या सर्व बाबी लक्षात घेता ही शस्त्रक्रिया वैद्यकीयदृष्ट्या आव्हानात्मक होती. मात्र, तज्ज्ञ डॉक्टरांचे कौशल्य, योग्य उपचारनियोजन आणि रुग्णालयातील वैद्यकीय सुविधांच्या साहाय्याने ही शस्त्रक्रिया यशस्वी झाली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती अतिशय चांगली असल्याने रुग्णालयातील डॉक्टर व उपचार पथकाने समाधान व्यक्त केले.

पालकमंत्री तथा डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशनचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे यांच्या पुढाकाराने रुग्णालयात सुपर स्पेशलिटीच्या सोई सुविधा गोरगरिबांसाठी उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे हे शक्य झाले आहे. आधुनिक वैद्यकीय उपचार आणि गुणवत्तापूर्ण रुग्णसेवा यांना नेहमीच प्राधान्य दिले जाते. अशा प्रकारच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडणे हे रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांची कार्यक्षमता, वैद्यकीय अनुभव आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धतीचे द्योतक आहे. समाजातील सर्व स्तरांतील रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या रुग्णालयाच्या प्रयत्नांना या यशामुळे आणखी बळ मिळाले आहे.

# पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना १५ हजार रुपये मानधन द्या; महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाचे आमरण उपोषण

### वृद्धापकाळात आर्थिक आधार, एसटी बसमधून मोफत प्रवास आणि अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी वडगाव गुप्ता येथील जागा देण्याची मागणी

महाराष्ट्र शासनाकडून विविध समाजभूषण व सामाजिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेल्या समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे.

नगर – महाराष्ट्र शासनाकडून विविध समाजभूषण व सामाजिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेल्या समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये मानधन देण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. महासंघाचे राज्याध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजभूषण पुरस्कार, संत रोहिदास पुरस्कार, भगवान बिरसा मुंडा पुरस्कार तसेच अन्य शासकीय पुरस्कारांनी अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. मात्र, पुरस्कार मिळाल्यानंतरही या समाजसेवकांना शासनाकडून कोणतेही नियमित मानधन किंवा आर्थिक मदत मिळत नसल्याची खंत महासंघाने व्यक्त केली आहे.

अनेक पुरस्कारप्राप्त समाजसेवकांनी आपल्या आयुष्यातील ५० ते ६० वर्षे समाजकार्यासाठी खर्ची घातली आहेत. समाजातील वंचित, उपेक्षित आणि गरजू घटकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला असून, अनेकांना शासनाच्या माध्यमातून न्याय मिळवून दिला आहे. मात्र, आता यातील बहुतांश कार्यकर्ते वृद्धापकाळात आहेत. उत्पन्नाचे साधन आणि आर्थिक आधार नसल्याने त्यांना दैनंदिन जीवन जगणेही कठीण झाले आहे. त्यामुळे स्वातंत्र्यसैनिकांप्रमाणे पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना दरमहा १५ हजार रुपये पेन्शन स्वरूपात मानधन देण्यात यावे. संबंधित पुरस्कारप्राप्त व्यक्तीचे निधन झाल्यास हे मानधन त्यांच्या पत्नीला देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या शिवशाही, शिवनेरी, हिरकणी, शिवाई, स्लीपर यांसह सर्व प्रकारच्या एसटी बसमधून पुरस्कारप्राप्त व्यक्ती व त्यांच्या एका साथीदाराला विनामूल्य प्रवासाची सुविधा देण्यात यावी, अशीही मागणी महासंघाने केली आहे.

#### अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी जागेचा प्रश्न

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी अहिल्यानगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथे जागा उपलब्ध करून देण्याचा प्रश्नही या आंदोलनातून उपस्थित करण्यात आला आहे. सन २०१७ मध्ये दलित महासंघाच्या माध्यमातून शासकीय मालकीच्या जमिनीवर स्मारक उभारण्यासाठी पहिली अधिकृत मागणी करण्यात आल्याचे महासंघाचे म्हणणे आहे. या प्रस्तावाचे राष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी शिफारस केली होती. त्यानंतर १० नोव्हेंबर २०१७ रोजी नाशिक विभागीय महसूल आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळातही महासंघाचे राज्याध्यक्ष नामदेवराव चांदणे यांनी मुंबई व नागपूर येथील अधिवेशनांमध्ये प्रत्यक्ष भेटी घेऊन या मागणीचा पाठपुरावा केल्याचे सांगण्यात आले. वडगाव गुप्ता ग्रामपंचायतीने स्मारकासाठी दहा एकर जागा देण्यास ना–हरकत दाखला (एनओसी) दिल्याचा तसेच २५ एप्रिल २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल शाखेने सादर केलेल्या तांत्रिक अहवालात संबंधित जागा वन विभागाची नसून महसूल विभागाची असल्याचे स्पष्ट केल्याचा दावा महासंघाने केला आहे.

सर्व कायदेशीर व तांत्रिक अहवाल स्मारकाच्या प्रस्तावाच्या बाजूने अनुकूल असतानाही संबंधित गटातील २२५ हेक्टर जमीन एमआयडीसीच्या विस्तारीकरणासाठी विनामूल्य वर्ग करण्याचा शासन निर्णय काढण्यात आल्याचा आरोप महासंघाने केला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीदरम्यान ३ मार्च २०२५ रोजी महसूल अभिलेखात एमआयडीसीच्या नावाची फेरफार नोंद करण्यात आल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रक्रियेची कायदेशीर तपासणी करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी प्रस्तावित जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पुरस्कारप्राप्त समाजसेवकांना सन्मानासोबत आर्थिक सुरक्षितता मिळावी, त्यांच्या वृद्धापकाळातील जीवनमान उंचावावे आणि अण्णाभाऊ साठे यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे.

या आमरण उपोषणात महासंघाचे राज्याध्यक्ष नामदेवराव चांदणे यांच्यासह काशिनाथ सुलाखे, संजय चांदणे, कडू बाबा लोंढे, विश्वनाथ अल्हाट, ना. म. साठे, भगवानराव जगताप, दिलीप सोळसे, अशोक भोसले, सुनील सकट, पोपटराव साठे, पोपटराव पाथरे, दत्ता विधावे, बापू कसबे, राधेलाल नाकवाल, हिराबाई गोरखे, निलेश चांदणे, राजू पवार आदी उपस्थित होते.



## गुरुवाणी – ९७

### 'भक्षक' बनू नका

जीवनात वेगवेगळ्या परिस्थिती निर्माण होतातच. त्याला तोंड देत पुढे चालायचे असते. अरिष्टनेमी आणि राजुलचे नाते आठ जन्मीचे होते. दोघांचा विवाह निश्चित झाला. अरिष्टनेमी विवाहासाठी सासरी दाखल झाले. तिथे सर्वांसाठी भोजनाची व्यवस्था केली होती. शाकाहारी, मांसाहारी भोजन तयार होत होते. मांसाहार म्हणजे भक्षण करणे असते. शाकाहार म्हणजे आहार ग्रहण करणे असते. गाय चरते तर सिंह भक्षण करतो असे म्हटले जाते. अरिष्टनेमी पाहतो पशुपक्षी मांसाहारासाठी मारले जात आहेत. त्यांचे ते दुःख पाहून अरिष्टनेमीला अनुभूती होते, इतक्या जीवांचा बळी जाऊन मला सुख मिळणार नाही. हे वैश्विक सत्य आहे की, 'दुसऱ्याला बरबाद करून तुम्ही आबाद होऊ शकत नाही.' अरिष्टनेमी तात्काळ निर्णय घेतो की ही व्यवस्था बदलली पाहिजे. त्याला कायमस्वरूपी व्यवस्था निर्माण करायची होती. तीर्थंकर बदल घडवणारे आणि व्यवस्था निर्माण करणारे असतात. अरिष्टनेमी सर्व त्याग करून दीक्षा घेण्यास निघतात. श्रीकृष्णाने समजून सांगण्याचा प्रयत्न केला. पण अरिष्टनेमीने स्पष्ट केले, पशुपक्ष्यांना मारणाऱ्या दुराचारींना मला सदाचारी करायचे आहे. इकडे राजुलपर्यंत ही वार्ता गेली. ती व्याकूळ झाली. ती अरिष्टनेमीच्याच मार्गावर जाण्याचा निर्धार करते. दरम्यान अरिष्टनेमीचा भाऊ रथनेमी राजुलकडे जाऊन तिच्याशी विवाहासाठी प्रयत्न सुरू करतो. राजुल एकेदिवशी त्याच्याकडे गिफ्ट मागते. तो खीर घेऊन जातो. राजुल ती खीर प्राशन करते व लगेच त्याच भांड्यात उलटी करून त्याला रिटर्न गिफ्ट देते. ती सांगते, माझ्या स्वप्नातही फक्त अरिष्टनेमीच आहेत व राहतील. पण रथनेमी सुद्धा म्हणतो, तू तुझ्या प्रेमाच्या मार्गाने जा. मी सुद्धा तुझ्यावरील प्रेमाच्या मार्गावर चालत राहील. तिकडे अरिष्टनेमी केवलज्ञानी झाला. राजुल, रथनेमी व इतर बरेच जण दीक्षा घेतात. ती गिरनार पर्वतावर जाते. तिथे एकदा अचानक मोठा पाऊस येतो. राजुल एका गुहेत जाते आणि तिथेच योगायोगाने रथनेमीही ध्यान करत असतो. ती ओले कपडे बदलत असताना तो तिला पाहून आकृष्ट होतो व तिला पुन्हा प्रस्ताव देतो. पण राजुल दृढनिश्चयी होती. ती आठवण करून देते, 'तू ज्याची उलटी केली तेच पुन्हा प्राशन करत आहे. किती लाचारी आहे ही'. ती त्याला संयमाचा मार्ग दाखवते. त्याला कळते ज्याच्यावर मी प्रेम करतो त्याच्याकडून जे मिळाले ते माझ्यासाठी प्रसाद आहे. रथनेमी तिला नमन करून तिच्या प्रमाणेच संयमाचा मार्ग अवलंबतो. तो प्रदीर्घ साधना करतो व केवल ज्ञानी होतो. जे समजदार असतात तेच श्रेष्ठ होतात.

– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.

# अहिल्यानगर शहरासह जिल्ह्याच्या काही भागात अवकाळी पावसाची हजेरी

नगर – अहिल्यानगर शहर आणि परिसरासह जिल्ह्याच्या काही भागात ३० ऑक्टोबरच्या मध्यरात्री मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली. रात्री अचानक बदललेल्या हवामानामुळे शहराच्या विविध भागांत मध्यम ते जोरदार स्वरूपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या, ज्यामुळे वातावरणात चांगलाच गारवा निर्माण झाला आहे. २९ ऑक्टोबरच्या रात्रीही नगर शहरात मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला होता. अर्णव चक्रीवादळाच्या आणि बदलत्या हवामान प्रणालीच्या प्रभावामुळे जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस झाला.

दिवसभर ढगाळ वातावरण आणि उकाडा जाणवत असताना मध्यरात्रीच्या सुमारास आकाशात विजेच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. सावेडी, पाईपलाईन रोड, जुने शहर, भिंगार आणि ग्रामीण पट्ट्यांमध्ये अचानक आलेल्या या पावसाने रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी साचले होते. पावसामुळे नागरिकांची रात्रीच्या वेळी धावपळ उडाली. नगर तालुक्यातही रात्री पावसाने चांगली हजेरी लावली.

### विजांच्या कडकडाटासह बरसला पाऊस, वातावरणात गारवा

ऐन सणासुदीच्या आणि काढणीच्या दिवसांत मध्यरात्री झालेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांची चिंता मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. शेतात सोंगणीला आलेली खरिपाची पिके, कापूस आणि बाजरीच्या पिकांना या पावसामुळे फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. ज्या भागांत काढणी झालेली पिके उघड्यावर आहेत, ती सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत जेणेकरून पुढील संभाव्य स्थानिक ढगाळ वातावरणामुळे पिकांचे नुकसान टळेल, असा सल्ला हवामान विभागाने शेतकऱ्यांना दिला आहे. तर, दुसरीकडे ज्याठिकाणी पाऊसच झालेला नाही त्या भागातील विहीरी व कुपनलिकांची पाणीपातळी वाढण्यास मदत होईल, असाही अंदाज वर्तविण्यात येत आहे.

### पुढील दोन–तीन दिवस पावसाचा अंदाज

आज ३१ ऑक्टोबर रोजी दिवसभर आकाश अंशतः ढगाळ राहील. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, दुपारनंतर किंवा संध्याकाळच्या सुमारास जिल्ह्यात काही ठिकाणी पुन्हा हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची किंवा मेघगर्जनेची शक्यता आहे. शहरात कमाल तापमान ३० अंश ते ३१ अंश सेल्सिअस आणि किमान तापमान २१ अंश ते २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याचा अंदाज आहे. पुढील २ ते ३ दिवस (१ आणि २ नोव्हेंबर) जिल्ह्यात स्थानिक पातळीवर अंशतः ढगाळ वातावरण आणि हलक्या पावसाच्या सरींचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ३ नोव्हेंबरनंतर हवामान पुन्हा कोरडे होण्याची शक्यता आहे. परंतु थंडीत वाढ होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने पुढील २४ तासांत मराठवाडा आणि लगतच्या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक १.सलमा अदलीब महंमद इसहाक २. जुबेदा कातुन सय्यद अब्दुल मितीन ३. परवेज मोहम्मद शफी सय्यद ४. शहेबाज महेमुद सय्यद ५. आमेरा महेमुद सय्यद ६. सय्यद साजीदऊलहक मझहरूलहक ७. समिना मकसूद सय्यद ८. मोईज मकसूद सय्यद ९. नबील मकसूद सय्यद १०. फरहिनअख्तर इम्तियाजअहमद सय्यद ११. काझी शरीफोददीन विकारोददीन १२. सय्यद आरीयाना अब्दुल कादर १३. काझी इस्तेकारोददीन शरीफोद्दीन १४. शाहीन रहीम सय्यद १५. अलीम रहीम सय्यद १६. इम्रान रहीम सय्यद १७. निखत तनवीर खान १८. सय्यद महंमद अनीस महंमद इसहाक (मयत वारस ) १८.अ. फरजाना अनीस सय्यद १८.ब. सय्यद हाजीक अनीस १८.क. मलिहानाज अनिस सय्यद सर्व रा. हाजी इब्राहीम स्टेट, अहमदनगर.यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन सदर मिळकत आमचे अशिल हे खरेदी करणार असुन सदरची मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा,लिज, गहाण, दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन ७ दिवसांचे आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**१) मिळकतीचे वर्णनः** जिल्हा तुकडी अहिल्यानगर, तालुका नगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, शहर अहिल्यानगर येथील बुरुड गल्ली भागातील मे.दु.निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कक्षेतील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

| सि.स.नं. | म्यु.घर नं. | चौ.मीटर |
|---|---|---|
| २४८७ | ७१६६ | १७२.२० |

**ही संपुर्ण जागा व त्यावर असलेले संपुर्ण बांधकाम व यातील लाईट मीटर, पाण्याचे नळ कनेक्शनसह आहे त्या परिस्थितीत संपुर्ण बांधकामासह मिळकती बाबत.**

यांसी चतु:सिमा–
पुर्वेस – लागु सि. स. नं. दक्षिणेस –रस्ता
पश्चिमेस – लागु सि. स. नं. उत्तरेस – बोळ
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.
दि. ३१/१०/२०२६, अहमदनगर.

**ॲड. नाजीम अहमद इस्माईल शेख** (बीएएलएलबी)
**ॲड. कुरेशी फैजान फारुक** (बीएएलएलबी, डीटीएल)
पत्ता– जुने कलेक्टर ऑफिसजवळ, डावरे गल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६०, ७२७६२५२४७८

## जाहीर नोटीस

आमचे अशील **सौ. ज्योत्स्ना उमेश कौर** रा. अर्पण चैतन्य कॅलनी , पुनममोती नगर , अहिल्यानगर यांनी सांगितल्यावरून व दिलेल्या माहीतीवरून तमाम लोकस कळविण्यात येते कि –

**मिळकतीचे वर्णन** – शहर अहिल्यानगर येथील महानगरपालीका हद्दीतील मिळकती सिटी सर्व्हे नं. २१३६ याचे क्षेत्र १९१.६० चौ.मिटर व सिटी सर्व्हे नं. ३०९८ अ याचे क्षेत्र २३.६० चौ. मिटर तदंगभूत वस्तुसह व मालकी वहीवाटीचे हक्कासह.

सदर मिळकती आमचे अशीलाचे वडील श्री. मधूकर माधवराव जक्कल यांचे मालकी वहीवाटीच्या होत्या. श्री. मधूकर माधवराव जक्कल यांचे तारीख २३.०२.२०१० रोजी व शकुंतला मधुकर जक्कल यांचे तारीख १५.०२.२००४ रोजी निधन झालेले आहे. त्यांचे कायदेशीर वारस म्हणजे–

१) श्री. महेंद्र मधूकर जक्कल – मुलगा, २) श्री. महंत मधूकर जक्कल – मुलगा, ३) संगिता नागेश गुर्जल – मुलगी, ४) सरला अशोक काऊर – मुलगी, ५) सौ. ज्योत्स्ना उमेश कौर – मुलगी

याप्रमाणे वारस होत. त्याप्रमाणे सिटी सर्व्हे रेकॉर्ड ला वरील मिळकतीस वरील नावांची रितसर नोंद झालेली आहे. याप्रमाणे सदरील दोनही मिळकती मध्ये आमचे अशीलाचा कयदेशीर अविभक्त मालकी हिस्सा होता व आहे. अशी सर्व सत्यपरिस्थिती असतांना वरील कयदेशीर वारसांपैकी कही वारस संगनमताने सदरील दोनही मिळकती आमचे अशीला चे पूर्व परवानगी शिवाय, संमती शिवाय बांधकाम करून किंवा आहे त्या स्थितीत परस्पर विल्हेवाट लावण्याचे विचारात असल्याचे आमचे अशिलास खात्रीलायक रित्या समजले आहे. तरी तमाम लोकास कळविण्यात येते कि वरील मिळकतीबाबत कोणीही काहीही व्यवहार करु नये. केल्यास तो आमचे अशीलास बंधनकरक राहणार नाही. कोणी काहीही व्यवहार केल्यास व्यवहार करणाऱ्यास कोणत्याही प्रकारे मालकी हक्क ,ताबा मिळणार नाही. याबाबत आमचे अशील सल्ला मिळेल त्याप्रमाणे लवकरच कायदेशीर करण्याचे विचारात आहेत. तसेच वरील १ ते ४ यांनी वरील मिळकतीत कोणत्याही प्रकारे बांधकाम करू नये. मिळकतीचे कोणत्याही स्वरूपात हस्तांतर करु नये. केल्यास ते आमचे अशिलावर व वरील मिळकतीवर बंधनकरक राहणार नाही. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारे फसवणूक होऊ नये म्हणून मुद्दाम हि जाहीर नोटीस देत आहे.
तारीख : ३१/१०/२०२६

**सौ. ज्योत्स्ना उमेशकौर – करिता**
**ॲड. अशोक एस .गांधी** (टॅक्स ॲडव्होकेट व नोटरी पब्लिक)
१, 'श्रीफळ', तीर्थकर कॉलनी, बुरुडगाव रोड, अहिल्यानगर.
मोबाईल नं. ९४२३७९२१६६

## नगर जिल्ह्यातील साडेपाच लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १०९ कोटी रुपये वर्ग

### किसान सन्मान योजनेचा २४ वा हप्ता जमा

नगर – किसान सन्मान योजनेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील ५ लाख ४४ हजार ७६२ शेतकऱ्यांच्या खात्यात १०८ कोटी ९५ लाख २४ हजार रुपये वर्ग झाले आहेत. या योजनेमुळे शेतकऱ्यांना मोठा आधार मिळत असून, योजनेमध्ये सातत्य राखणे हेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे यश असल्याचे प्रतिपादन जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

केंद्र सरकारने सुरू केलेल्या किसान सन्मान योजनेचा २४ वा हप्ता ३० ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाला आहे. केंद्र सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी सुरू केलेली ही योजना ऐतिहासिक ठरली असून, वर्षाला ६ हजार रुपये थेट बँक खात्यात वर्ग होत असल्याने या योजनेचा मोठा दिलासा शेतकऱ्यांना मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील ५ लाख ४४ हजार ७६२ शेतकऱ्यांच्या खात्यात प्रत्येकी २ हजार रुपयांप्रमाणे १०८ कोटी ९५ लाख २४ हजार रुपये जमा झाले असल्याचे सांगून मंत्री विखे म्हणाले की, सद्यःस्थितीत पेरणीची कामे सुरू असताना अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी ही योजना दिलासा देणारी ठरते. यापूर्वी २३ हप्ते शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाल्याने या योजनेबाबत शेतकऱ्यांमध्ये मोठे समाधान आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांसाठी सुरू केलेल्या अनेक योजनांपैकी किसान सन्मान योजना ही महत्त्वपूर्ण ठरली असून, केंद्र सरकारने सुरू केलेल्या सर्व योजना अखंडितपणे सुरू आहेत. योजनांच्या अंमलबजावणीमध्ये केंद्र सरकारकडून सातत्य राखले आहे.

### तालुकानिहाय शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झालेले अनुदान

अकोले तालुक्यातील ३४ हजार ५०८ शेतकऱ्यांना ६ कोटी ९० लाख, जामखेड २९ हजार ९४६ शेतकऱ्यांना ५ कोटी ९८ लाख, कर्जत ४३ हजार ५३९ शेतकऱ्यांना ८ कोटी ७० लाख, कोपरगाव २७ हजार ०६५ शेतकऱ्यांना ५ कोटी ४१ लाख, अहिल्यानगर ३० हजार ५५७ शेतकऱ्यांना ६ कोटी १२ लाख, नेवासा ५३ हजार ५३१ शेतकऱ्यांना १० कोटी ७० लाख, पारनेर ५० हजार शेतकऱ्यांना १० कोटी, पाथर्डी ३९ हजार ८५३ शेतकऱ्यांना ७ कोटी ९७ लाख, राहाता २३ हजार ८७२ शेतकऱ्यांना ४ कोटी ७७ लाख, राहुरी ३८ हजार १९५ शेतकऱ्यांना ७ कोटी ६३ लाख, संगमनेर ५८ हजार ५७६ शेतकऱ्यांना ११ कोटी ७१ लाख, शेवगाव ४२ हजार ३८१ शेतकऱ्यांना ८ कोटी ४७ लाख, श्रीगोंदा ५० हजार ४४७ शेतकऱ्यांना १० कोटी ८९ लाख, श्रीरामपूर २२ हजार २३९ शेतकऱ्यांना ४ कोटी ४४ लाख रुपये, अशा रकमा तालुकावार शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग झाले असल्याचे विखे यांनी सांगितले.

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शहरातून एकता रॅली काढण्यात आली होती. (छायाचित्र – अमित मन्यार)

# बांधकामामध्ये पाण्याचा योग्य उपयोग

### पाणी वाचवा आणि बांधकामाचा दर्जाही जपा

घर बांधताना सिमेंट, वाळू आणि सळ्यांकडे आपण बारकाईने लक्ष देतो. पण रोज वापरल्या जाणाऱ्या पाण्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. कधी कॉँक्रीटमध्ये गरजेपेक्षा जास्त पाणी टाकले जाते, तर कधी कॉँक्रीट झाल्यानंतर त्याला पुरेसे पाणी दिले जात नाही. या दोन्ही गोष्टींमुळे बांधकामाच्या दर्जावर परिणाम होऊ शकतो.

पाणीटंचाईच्या काळात पाणी जपून वापरणे गरजेचे आहे. मात्र पाणी वाचवायचे म्हणून बांधकामाला आवश्यक असलेले पाणी कमी करणे योग्य नाही. कोणत्या कामासाठी किती आणि कसे पाणी वापरायचे, हे समजून घेतले तर पाण्याची बचतही होईल आणि कामही चांगले होईल.

### कॉँक्रीटमध्ये अंदाजाने पाणी वाढवू नका

कॉँक्रीट मऊ असेल तर ते टाकायला आणि पसरवायला सोपे जाते. त्यामुळे कामगार कधी मिक्सरमध्ये, तर कधी साइटवर आलेल्या तयार कॉँक्रीटमध्ये जास्त पाणी घालतात. पण काम सोपे व्हावे म्हणून पाणी वाढवणे चुकीचे आहे.

कॉँक्रीटमधील पाण्याचे प्रमाण ठरवताना सिमेंटचे प्रमाण, वाळू व खडीमधील ओलावा आणि ठरवलेले मिश्रण विचारात घ्यावे लागते. जास्त पाण्यामुळे कॉँक्रीटची मजबुती आणि टिकाऊपणा कमी होऊ शकतो. कॉँक्रीट टाकताना अडचण येत असेल तर अभियंत्याला सांगावे. स्वतःहून पाणी वाढवू नये.

### कॉँक्रीटला पाणी देणे का गरजेचे आहे?

कॉँक्रीट टाकून झाले म्हणजे त्याचे काम पूर्ण झाले असे नाही. सिमेंटची प्रक्रिया सुरू राहण्यासाठी त्यात योग्य ओलावा टिकणे गरजेचे असते. यासाठी कॉँक्रीटला पाणी देणे आणि ते लवकर कोरडे पडून न देणे, यालाच क्युरिंग म्हणतात.

सकाळी एकदा पाणी मारले आणि नंतर दिवसभर स्लॅब कोरडा राहिला, तर योग्य क्युरिंग होत नाही. किती दिवस आणि कोणत्या पद्धतीने पाणी द्यायचे, हे सिमेंटचा प्रकार, हवामान आणि काम पाहून अभियंत्याने ठरवावे.

### स्लॅबवर पाणी अडवून वापरा

स्लॅबवर पाइप सुरू ठेवला की बरेच पाणी कडेकडून खाली वाहून जाते. तरी काही भाग कोरडेच राहतात. त्याऐवजी कॉँक्रीटचा वरचा भाग खराब होणार नाही इतका घट्ट झाल्यावर छोटे बांध करून पाणी अडवता येते. बांधातून पाणी गळत असेल तर ती जागा दुरुस्त करावी. पाणी सगळीकडे पोहोचते आहे का आणि कोपरे कोरडे राहत नाहीत ना, हेही पाहावे. पाणी व्यवस्थित अडवले तर वारंवार पाइप लावण्याची गरज कमी होते.

### कॉलम आणि बीमसाठी ओल्या गोण्या वापरा

कॉलम आणि बीमला पाणी मारल्यानंतर ते लगेच खाली वाहून जाते. अशा ठिकाणी ओल्या गोण्या किंवा ओलावा टिकवणारे योग्य कापड वापरता येते.मात्र गोण्या गुंडाळल्या म्हणजे काम संपले असे समजू नये. त्या कॉँक्रीटला लागून असाव्यात आणि सतत ओल्या राहाव्यात. कोरड्या झालेल्या गोण्या उपयोगाच्या नाहीत. ऊन आणि वाऱ्यामुळे पाणी लवकर सुकत असेल तर अधिक लक्ष द्यावे.

काही कामांसाठी ओलावा टिकवणारे विशेष द्रव्य, म्हणजे क्युरिंग कंपाउंड वापरता येते. मात्र पुढील प्लास्टर किंवा वॉटरप्रूफिंगला अडचण येणार नाही याची खात्री करून, अभियंत्याच्या सल्ल्यानेच ते वापरावे.

### विटा आणि ब्लॉकला सारखेच भिजवू नका

मातीच्या विटा खूप कोरड्या असतील तर त्या गाऱ्यातील पाणी पटकन शोषून घेतात. त्यामुळे वापरण्यापूर्वी त्यांना आवश्यकतेनुसार ओले करावे. मात्र विटांमधून पाणी निथळत असताना त्या लगेच वापरू नयेत. मातीच्या विटा, कॉँक्रीट ब्लॉक आणि एएसी ब्लॉक यांचे प्रकार वेगवेगळे आहेत. त्यामुळे सगळ्यांना एकाच पद्धतीने पाण्यात भिजवू नये. कोणते साहित्य वापरले आहे, त्यानुसार उत्पादकाच्या सूचना आणि अभियंत्याचा सल्ला घ्यावा.

### पाणी स्वच्छ आणि कामासाठी योग्य असावे

पाणी दिसायला स्वच्छ असले तरी ते बांधकामासाठी योग्य असेलच असे नाही. त्यात तेल, जास्त क्षार, सांडपाणी किंवा हानिकारक रसायने नसावीत. बोअरवेल किंवा टँकरच्या पाण्याबद्दल शंका असेल तर त्याची तपासणी करून घ्यावी. पावसाचे साठवलेले पाणी किंवा आधी वापरलेले पाणी पुन्हा वापरायचे असेल, तरी ते त्या कामासाठी योग्य आहे का हे तपासवे.

### छोट्या गोष्टींकडे लक्ष दिले तरी पाणी वाचते

समजा, साइटवर स्लॅबला पाणी देण्यासाठी पाइप सुरू आहे. पाणी खाली रस्त्यावर वाहत आहे, पण स्लॅबचा दुसरा कोपरा कोरडा आहे. अशा वेळी जास्त पाणी आणण्यापेक्षा पाणी देण्याची पद्धत सुधारणे गरजेचे आहे. पाण्याची टाकी भरल्यानंतर नळ बंद करणे, पाइपची गळती दुरुस्त करणे आणि काम झाल्यावर पाणी बंद करणे या साध्या सवयी उपयोगी पडतात. पाइपच्या टोकाला बंद करता येणारा नळ बसवला तर पाण्यावर नियंत्रण ठेवता येते. साधने धुण्यापूर्वी त्यांना चिकटलेला गारा काढावा. त्यामुळे कमी पाण्यात स्वच्छता होते. मात्र सिमेंट मिसळलेले धुण्याचे पाणी थेट कॉँक्रीटमध्ये घालू नये.

### घरमालकानेही थोडे लक्ष द्यावे

कॉँक्रीटमध्ये कोणी स्वतःहून जास्त पाणी घालत नाही ना, स्लॅब आणि कॉलम कोरडे राहत नाहीत ना आणि पाइप उगाच सुरू नाही ना, एवढे पाहिले तरी फरक पडतो. पाणी देण्याची जबाबदारी एका व्यक्तीकडे दिली तर काम अधिक व्यवस्थित होते. घर बांधताना पाणी जपून वापरता येते. त्यासाठी कामाला आवश्यक पाणी कमी करण्याची गरज नाही. योग्य पद्धत आणि थोडे लक्ष दिले, तर पाणीही वाचते आणि घराची मजबुतीही जपता येते. पाणी वाया घालवू नका; पण बांधकामाला आवश्यक पाणी कमीही पडू देऊ नका.

**Er. Salim Masum Shaikh**
**B.E. Civil, M-Tech**
**Structures (COEP)**
**Chartered Engineer,**
**MISSE, MIE, MIV**
**My भूमी Consultants**

AESA
Architects, Engineers & Surveyors
Association Ahilyanagar

# वनहक्कधारकांसाठी मोठी संधी! १५ डिसेंबरपर्यंत प्रलंबित दावे निकाली काढण्याची विशेष मोहीम

**नामंजूर वनहक्क दाव्यांचीही होणार फेरतपासणी; मंजूर हक्कांच्या ७-ई/१२-ई नोंदीही मिळणार : पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसदेचा मोहिमेसाठी पुढाकार**

नगर – वनजमिनीवर शेती करून उपजीविका करणाऱ्या तसेच वनक्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या कुटुंबांसाठी वनहक्क अधिनियम २००६ अंतर्गत प्रलंबित असलेले वैयक्तिक व सामूहिक वनहक्क दावे निकाली काढण्यासाठी तसेच यापूर्वी नामंजूर झालेल्या दाव्यांची फेरतपासणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. महसूल विभागाच्या २७ ऑक्टोबर रोजीच्या परिपत्रकानुसार ही मोहीम १५ डिसेंबर २०२६ पर्यंत राबविण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून वनहक्काच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्र कुटुंबांना आपली बाजू मांडण्याची आणि दाव्यांचा पाठपुरावा करण्याची संधी उपलब्ध झाली असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदच्या वतीने देण्यात आली आहे.

या विशेष मोहिमेत ग्रामस्तरीय वनहक्क समिती, उपविभागीय समिती आणि जिल्हास्तरीय समित्यांकडे प्रलंबित असलेले सर्व वैयक्तिक व सामूहिक दावे समाविष्ट करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, यापूर्वी नामंजूर झालेल्या दाव्यांचीही पुन्हा तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नामंजुरीची कारणे संबंधित दावेदारांना समजावून सांगून त्यांना अतिरिक्त पुरावे आणि आपले म्हणणे सादर करण्याची संधी द्यायची आहे. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पात्रतेनुसार योग्य निर्णय घेण्याची कार्यवाही पूर्ण करायची आहे.

वनहक्कासाठी अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वननिवासी यांच्यासाठी वेगवेगळे पात्रता निकष आहेत. इतर पारंपरिक वननिवासींसाठी १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान तीन पिढ्यांचा वननिवास आणि उपजीविकेसाठी वन किंवा वनजमिनीवरील अवलंबित्व सिद्ध करणे आवश्यक आहे. कायद्यानुसार एका पिढीचा कालावधी २५ वर्षे मानला जातो. मात्र, ही ७५ वर्षांची अट अनुसूचित जमातींच्या दाव्यांना सरसकट लागू होत नाही. तसेच दावा केलेल्या वनजमिनीवरील ताबा १३ डिसेंबर २००५ पूर्वीचा असणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधितांनी आपल्या पात्रतेनुसार कागदपत्रांची पूर्तता करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वनहक्कासाठी अर्ज केलेल्या प्रत्येक कुटुंबाने आपला दावा सध्या कोणत्या स्तरावर प्रलंबित आहे, याची माहिती घ्यावी. ग्रामसभेचा ठराव झाला आहे का, दावा उपविभागीय समितीकडे आहे की जिल्हास्तरीय समितीकडे, तसेच दाव्याबाबत मंजुरी अथवा नामंजुरीचा लेखी आदेश झाला आहे का, याची खात्री करावी. अर्जाची पोच, दावा क्रमांक, ग्रामसभेचा ठराव आणि संबंधित निर्णयांच्या प्रती सुरक्षित ठेवाव्यात.

वनहक्क सिद्ध करण्यासाठी उपलब्ध जुने वन व महसूल अभिलेख, नकाशे, वहिवाटीच्या नोंदी, पात्रतेशी संबंधित कागदपत्रे आणि ज्येष्ठ ग्रामस्थांची नियमानुसार नोंदवलेली साक्ष असे ग्राह्य पुरावे सादर करता येतील. आवश्यक अभिलेख मिळविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी दावेदारांना सहकार्य करावे, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. केवळ तांत्रिक किंवा अभिलेखीय त्रुटींमुळे पात्र दावे अनावश्यकपणे प्रलंबित राहू नयेत, याची दक्षता घेण्याचे निर्देश असल्याचे म्हंटले आहे.

या मोहिमेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे यापूर्वी मंजूर झालेल्या वनहक्कांची अभिलेखात अचूक नोंद करणे. पूर्वी मंजूर झालेले आणि या मोहिमेत मंजूर होणारे पात्र हक्कधारक यांच्या स्वतंत्र याद्या तयार करून संबंधित महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांची नावे, मंजूर क्षेत्र, गट किंवा सर्वे क्रमांक यांची पडताळणी करायची आहे. त्यानुसार ७-ई/१२-ई नमुन्यांतील अभिलेख तयार करून पात्र हक्कधारकांना १५ डिसेंबरपर्यंत उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, ग्रामपंचायतींनी आवश्यक ग्रामसभा आयोजित करून दावे प्रलंबित राहणार नाहीत याची काळजी घ्यायची आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण मोहिमेचे समन्वय व संनियंत्रण करायचे असून विभागीय आयुक्तांनी दर १५ दिवसांनी प्रगतीचा आढावा घ्यायचा आहे. विशेष मोहिमेतील १५ डिसेंबर २०२६ ही तारीख प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा आहे. ती नवीन वनहक्क दावा दाखल करण्याची अंतिम मुदत नाही. तसेच या मोहिमेमुळे प्रत्येक दावेदाराला आपोआप वनपट्टा मिळणार नसून कायद्यातील पात्रतेचे निकष पूर्ण करणे आवश्यक आहे.

त्यामुळे वाळुंजसह परिसरातील वनहक्कधारकांनी आपल्या दाव्यांची सद्यस्थिती तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित समित्यांकडे लेखी पाठपुरावा करावा. प्रलंबित दावे, जुन्या नामंजुरीची फेरतपासणी आणि मंजूर हक्कांच्या अभिलेखांची पूर्तता या तीनही बाबींकडे ग्रामस्थांनी गांभीर्याने लक्ष द्यावे. पीपल्स हेल्पलाईन, भारतीय जनसंसद आणि ग्रामस्थांनीही या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुढाकार घेऊन पात्र कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

या अभियानासाठी अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले, अमित थोरात आदी प्रयत्नशील आहेत.

# पारनेर, अकोले लढतीने जिल्हा बँकेच्या निवडणुकीत रंगत

नगर – जिल्हा सहकारी बँकेच्या १० जागांसाठी २ नोव्हेंबर रोजी मतदान होत असून पारनेर व अकोले सेवा सोसायटी मतदारसंघात अधिक चुरस असल्याने या दोन्ही लढती रंगतदार होणार आहेत. राहुरी व कर्जत सेवा सोसायटी मतदारसंघात अपेक्षित निकाल असून इतर जनरलच्या सहा जागांवरही फारसे वेगळे निकाल लागण्याची शक्यता नसल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. बँकेच्या ११ जागा आधीच बिनविरोध झालेल्या असून ज्या १० जागांसाठी निवडणूक होत आहे. त्यातील एखाद दुसरा अपवाद वगळता सर्व जागांवर विखे–थोरात–गडाख गटाच्या सहकार पॅनलचे वर्चस्व राहण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सेवा सोसायटी मतदारसंघातील १० व बिगर शेती मतदारसंघातील जनरलची एक अशा ११ जागा आधीच बिनविरोध झालेल्या असून या अकराही जागा सहकार पॅनलच्या पारड्यात पडलेल्या आहेत. आता उर्वरीत १० जागांसाठी निवडणूक होत असून यात पारनेर, अकोले, राहुरी व कर्जत या चार सेवा सोसायटी मतदारसंघासह ओबीसी राखीव, शेतीपूरक, अनुसूचित जाती–जमाती, भटके विमुक्त प्रवर्ग यातील प्रत्येकी एक व महिला राखीवच्या दोन अशा जनरलच्या सहा जागांसह एकूण दहा जागांवर लढत होत आहे. यासाठी विखे–थोरात–गडाख गटाचे सहकार पॅनल असून त्याविरोधात लंके व लोखंडे यांचे सहकार परिवर्तन पॅनल आहे.

विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी कर्जत व जामखेड सेवा सोसायटी मतदारसंघासह ओबीसी प्रवर्ग व महिला राखीव गटातही एक असे चार उमेदवार दिले होते. त्यातील जामेखड सेवा सोसायटीची जागा बिनविरोध झालेली असून कर्जतमध्ये त्यांच्या गटाच्या ज्योती शिंदे यांना निवडून येण्यास फारशी अडचण वाटत नाही परंतु त्यांनी ओबीसी व महिला प्रवर्गात जे दोन उमेदवार दिलेले आहेत त्यांनी या निवडणुकीतून माघार घेतल्याची पोस्ट दोन दिवसांपासून सोशल मिडियावर व्हायरल होत आहेत. पण त्यास अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

दुसरीकडे विखे–थोरात–गडाख गटाचे दहा जागांसाठी आठ, तर लंके–लोखंडे गटाचे सात उमेदवार रिंगणात आहेत. अकोलेमध्ये जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सीताराम गायकर यांची कन्या संजीवनी शिंदे व आ. किरण लहामटे यांच्यात सरळ लढत होत असून हे दोन्ही उमेदवार स्वतंत्रपणे निवडणूक लढत आहेत. ही लढत लक्षवेधी होत असून गायकर व लहामटे यांच्यात कोण बाजी मारणार याची उत्सुकता आहे. गायकर हे अनेक वर्षापासून बँकेत सत्तेत असल्याने त्यांचा या मतदारसंघावर प्रभाव आहे, तर दुसरीकडे आ. लहामटे यांनीही आपली प्रतिष्टा पणाला लावली आहे.

पारनेर सेवा सोसायटी मतदारसंघातील लढत ही जिल्ह्यात लक्षवेधी ठरत आहे. येथे स्वतः खा. नीलेश लंके हे उमेदवार असून त्यांच्या विरोधात भाजपाचे तालुकाध्यक्ष व विखे यांचे कट्टर समर्थक राहुल शिंदे हे उभे आहेत. पण ही लढत लंके–शिंदे अशी न मानता ती लंके व डॉ. सुजय विखे यांच्यातील मानली जात आहे. त्यामुळे या लढतीत कोण बाजी मारणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून आहे.

लोकसभेतील पराभवाचा वचपा पुन्हा एकदा विखे यांना या निवडणुकीच्या माध्यमातून काढायचा आहे, तर लंके यांनीही तालुक्यात आपले वर्चस्व सिध्द करायचे असल्याने या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झालेली आहे.

# 'पारिजात चौक' होणार 'राजर्षी शाहू महाराज चौक'?

पारिजात चौकाचे नामकरण 'राजर्षी शाहू महाराज चौक' करण्याच्या मागणीचे निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांना प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने देण्यात आले.

नगर – शहरातील गुलमोहोर रोडवरील पारिजात चौकाचे नामकरण 'पारिजात चौक' करण्याच्या महापालिका प्रशासनाच्या प्रस्तावाला 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज सेवाभावी प्रतिष्ठाण' (ट्रस्ट) वतीने तीव्र हरकत घेण्यात आली आहे. या चौकाचे नामकरण 'राजर्षी शाहू महाराज चौक' करावे, अशी मागणी करण्यात आली असून, यासंदर्भातील निवेदन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यांना प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने हरकतीचे निवेदन देण्यात आले. यावेळी हर्षल बांगर, गोकुळ गोधडे, अनुप सत्राळकर, अजित सिद्दम, साहिल पवार, अजिंक्य शिंदे, गजेंद्र गोधडे, मनोज गोधडे, श्रीकांत भालके, आदित्य खाकाळ आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

प्रतिष्ठानच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, गेल्या पंचवीस वर्षांपासून या प्रतिष्ठानाच्या माध्यमातून पारिजात चौक परिसरात विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. यामध्ये गणेशोत्सव, शिवजयंती उत्सव, राजर्षी शाहू महाराज जयंती उत्सव तसेच विविध महापुरुषांच्या जयंती व स्मृतिदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गेल्या २५ वर्षांपासून या परिसरात सामाजिक सलोखा, महापुरुषांचे विचार आणि जनजागृती करण्याचे कार्य अविरत सुरू असल्याने, या चौकाला राजर्षी शाहू महाराजांचे नाव देणे हा त्यांच्या विचारांचा व सामाजिक कार्याचा खरा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन प्रतिष्ठानने केले आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण, सामाजिक समता, आरक्षण, बहुजनांचे उत्थान आणि सामाजिक न्यायासाठी समर्पित केले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्दिष्टानेच पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असे अधिकृत नामकरण करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

महानगरपालिका प्रशासनाने महासभेत ठेवलेल्या नामकरणाच्या विषयाचा पुनर्विचार करावा, प्रतिष्ठानच्या २५ वर्षांच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याची दखल घ्यावी आणि पारिजात चौकास 'राजर्षी शाहू महाराज चौक' असा अधिकृत नामकरणाचा ठराव मंजूर करावा, अशी मागणी प्रतिष्ठानतर्फे करण्यात आली आहे.

सावेडी नाका येथील पालवी शिशुविहार, शुभमंगल कार्यालयात आयोजित को जागर्ति या प्रवचन सेवेत दादेगाव येथील श्री देवदास स्वामी मठाचे समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी बोलत होते.

# संतचरित्रातून जीवन जगण्याची दिशा मिळते

**मंदारबुवा रामदासी यांचे प्रतिपादन; कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त को जागर्ति प्रवचन सेवा**

नगर – संतांचे चरित्र म्हणजे केवळ त्यांच्या जीवनाचा इतिहास नसून, त्यांनी जगलेले आदर्श जीवन समजून घेण्याची आणि ते आचरणात आणण्याची प्रेरणा होय. संतांच्या जीवनातील विचार, कर्म आणि साधना यांचा अभ्यास करून आपणही जीवनात सदैव जागरूक राहिले पाहिजे. सद्गुरूंच्या चरणी असलेली मोक्षलक्ष्मी प्राप्त करण्यासाठी आत्मजागृती आवश्यक आहे, असे प्रतिपादन दादेगाव येथील श्री देवदास स्वामी मठाचे समर्थ भक्त मंदारबुवा रामदासी यांनी केले.

श्री क्षेत्र सोनई येथील कृष्णानंद सरस्वती स्वामी महाराज यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त स्वामी कृष्णानंद आयुर्वेदालयाच्यावतीने सावेडी नाका येथील पालवी शिशुविहार, शुभमंगल कार्यालयात आयोजित को जागर्ति या प्रवचन सेवेत ते बोलत होते. यावेळी श्री क्षेत्र सोनई येथील श्री रेणुका दरबारचे यज्ञेश्वर महाराज तसेच छत्रपती संभाजीनगर येथील श्री हरिहर सद्गुरू शक्तिपीठाचे अनिरुद्ध महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

मंदारबुवा रामदासी म्हणाले की, मंत्र, तीर्थ, देवत्व, ज्योतिषी, वैद्य आणि गुरू यांच्याविषयी आपण जशी श्रद्धा व भावना ठेवतो, त्यानुसार आपल्याला फलप्राप्ती होते. त्यामुळे गुरुपरंपरेविषयी कृतज्ञता बाळगली पाहिजे. संतांच्या चरित्राचा अभ्यास करताना त्यांच्या जीवनातील खरा गाभा समजून घेणे महत्त्वाचे आहे. कृष्णानंद स्वामी महाराज आणि हंसतीर्थ स्वामी महाराज यांनी भारतीय संस्कृतीने सांगितलेले आदर्श जीवन स्वतःच्या आचरणातून दाखवून दिले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी कृष्णानंद स्वामी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. प्रास्ताविक मुग्धा घोटणकर यांनी केले. सूत्रसंचालन वैद्य नेहा यांनी केले. वैद्य अनिकेत घोटणकर यांनी आभार मानले.

# स्व. शंकरराव घुले माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेच्या १५ टक्के डिव्हिडंड वाटपास प्रारंभ

**माथाडी कामगारांच्या आर्थिक उन्नतीसाठी पतसंस्था कटिबद्ध; जास्तीत जास्त कामगारांनी सभासद व्हावे : चेअरमन रवींद्र भोसले**

स्व.शंकरराव घुले माथाडी कामगार सहकारी पतसंस्थेच्या १५ टक्के (डिव्हिडंड) लाभांश वाटपास प्रारंभ करण्यात आला. यावेळी रेल्वे मालधक्का वरील कामगार संतोष वाघमारे यांचा सन्मान करण्यात आला

नगर – मार्केट यार्ड येथील स्वर्गीय शंकरराव घुले माथाडी कामगारांच्या सहकारी पतसंस्थेच्या वतीने सभासदांना १५ टक्के लाभांश (डिव्हिडंड) वाटप करण्यास प्रारंभ करण्यात आला. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक लाभ मिळवून देण्याबरोबरच माथाडी कामगारांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. संस्थेच्या प्रगतीमध्ये सभासदांचा विश्वास, संचालक मंडळाचे नियोजन आणि मार्गदर्शकांचे मार्गदर्शन महत्त्वपूर्ण ठरत आहे. पतसंस्थेने यंदा सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा निर्णय घेतला असून, हा लाभांश वाटपाचा उपक्रम सभासदांसाठी आनंददायी ठरत आहे. पतसंस्थेचे जास्तीत जास्त माथाडी कामगारांनी सभासद व्हावे आणि संस्थेच्या आर्थिक वाटचालीत सहभागी व्हावे, असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले यांनी यावेळी केले.

पतसंस्थेचे मार्गदर्शक अविनाश घुले यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कारभार अत्यंत सुरळीतपणे सुरू आहे. माथाडी कामगार हा आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे, त्याला आर्थिक अडचणीच्या काळात संस्थेचा आधार मिळाला पाहिजे, या उद्देशाने पतसंस्थेचे कामकाज सुरू आहे. सहकाराच्या माध्यमातून कामगारांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेने आर्थिक प्रगती साधली असून, त्याचाच सकारात्मक परिणाम म्हणून सभासदांना १५ टक्के लाभांश वितरित करण्यात येत आहे. संस्थेच्या माध्यमातून भविष्यातही सभासदांच्या हिताचे निर्णय घेण्यावर संचालक मंडळाचा भर राहणार असल्याचे तज्ज्ञ संचालक संजय घुले यांनी आपल्या मनोगतात सांगितले. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी सर्व सभासदांनी संस्थेशी जोडले जावे, नियमित व्यवहार करावेत आणि सहकाराच्या या चळवळीला बळ द्यावे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी व्हाईस चेअरमन नवनाथ बडे यांनी प्रास्ताविक करताना संस्थेच्या कामकाजाची माहिती दिली. माथाडी कामगारांच्या सहकारातून उभ्या राहिलेल्या या पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास पतसंस्थेचे चेअरमन रवींद्र भोसले, व्हाईस चेअरमन नवनाथ बडे, तज्ज्ञ संचालक संजय घुले, संचालक आदिनाथ चेके, मच्छिंद्र दहिफळे, लक्ष्मण वायभासे, सागर पोळ, मंदाबाई सूर्यवंशी, रतनबाई आजबे, राम सरोदे, सचिव बबनराव सुसे यांच्याहस्ते रेल्वे मालधक्का वरील कामगार संतोष वाघमारे यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी कौसर पठाण, शाहूल वडागळे आदी उपस्थित होते. संचालक आदिनाथ चेके यांनी आभार मानले.

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..

दिवाळी धमाका ऑफर

₹999/-* प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/-* चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)

सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे
11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)

ऑफर कालावधी – 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध

चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*

## पाहिजेत रिसेप्शनिस्ट (लेडी/जेन्टस्)

| कामाची वेळ | पगार प्रति महिना |
|---|---|
| लेडीज् – सकाळी ९ ते दुपारी २ | ६०००/– रूपये |
| जेंट्स – सकाळी ९ ते दुपारी २ | ६०००/– रूपये |
| जेंट्स – दुपारी २ ते रात्री ९ | ८०००/– रूपये |

डॉ. अभय मुथा (होमिओपॅथिक क्लिनिक)
विनायकनगर, नगर–पुणे रोड, अहिल्यानगर.
91 30 30 90 13

## चाहिए
चाहिए भारी मात्रा में सिक्योरिटी गार्ड,वा सिक्योरिटी सुपरवायझर वा मामा, मावशी अहिल्यानगर के लिए
संपर्क : मिश्रा सिक्युरिटी
अॅण्ड फायर सर्विस
सद्गुरु क्लासिक अपार्टमेंट पवननगर, भिस्तबाग चौक, न्यू तलाठी ऑफिस, सावेडी, अ.नगर
9422222241/8888886073

## WANTED
TRANSCRIPTIONISTS
BPO Company Requries
TRANSCRIPTIONISTS
For QC
(Voice to Text)
EMail:-
CONTACT@CONSELLENCE.COM

## विकणे/भाड्याने देणे
सारसनगर येथे नवीन
3BHK
बंगला विकणे आहे
2BHK
फ्लॅट भाड्याने आहे
9604914748

## प्लॉट विकणे
रो–बंगलो स्कीमसाठी उपयुक्त रेसिडेन्शयल प्लॉट उपलब्ध
L ब्लॉक पारस कंपनी मागील
9607519536
7745072121

## बंगला विकणे
क्लासिक व्हीला सोसायटी, संभाजीनगर तपोवन रोड, अहिल्यानगर येथील सुसज्ज–प्रशस्त, दोन रस्ते असलेला कॉर्नरचा
2BHK रो बंगला नं १
(एकुण जागा एक गुंठा) विकणे आहे.
तपोवन रस्त्यापासून दोन मिनिटांच्या अंतरावर हा रो–बंगला आहे.
विमल सुर्यवंशी 9881771981
सपना सुर्यवंशी 9762920027

## पाहिजेत
भांड्याच्या दुकानात कामासाठी हेल्पर पाहिजे
(पगार: १0000 ते १५000)
हिंदुस्थान किचन्स्
मानसरे गल्ली, अहिल्यानगर
7276888970

लोकेश मार्केटिंग 9766045549
चोखंदळ विक्रेत्यांसाठी व ग्राहकांसाठी
आहेर घर
१८+१८+१८=५४ प्रकार
दिवाळी कार्तीक मास लग्नसराई, गिफ्ट पॅक
अनुभव हिच खात्री
एक वेळ अवश्य भेट द्या
लक्ष्मण एजन्सीज 9890963100

Shankarleela INFRASTRUCTURES PVT. LTD.
## पाहिजेत
आम्ही खालील पदासाठी कुशल व अनुभवी उमेदवारांच्या शोधात आहोत
सीनियर अकाउंटंट - पदे 2 | ज्युनिअर अकाउंटंट - पदे 2
साईट सुपरवायझर - पदे 4
साईट इंजिनिअर (बी.ई. सिव्हिल) - पदे २
ऑफिस बॉय – पदे २
आत्ताच अर्ज करा!
ऑफिसचा पत्ता : ३०१, ए.पी.स्क्वेअर, प्रोफेसर चौक, सावेडी, अ.नगर
संपर्क - 7063638080 | 7037374949

अहिल्यानगर व बीडकरीता
## पाहिजेत
- सर्व्हिस अॅडव्हायझर
- एचआर एक्झिक्युटिव्ह (एमबीए)
- रिसेप्शनिस्ट (लेडीज) (एमआयडीसी पांढरीपूलजवळ बस उपलब्ध)
- फ्लोअर सुपरवायझर
- बॉडीशॉप एक्झिक्युटिव्ह
- सर्व्हिस अॅडव्हायझर

शिक्षण- १०, १२ वी, ITI डिप्लोमा/डिग्री,
संपर्क- कॉल-हायस्कील मॅनपॉवर
9822613188


भारताचे लोहपुरुष आणि स्वतंत्र भारताच्या एकात्मतेचे शिल्पकार
सरदार वल्लभभाई पटेल
यांच्या जयंती निमित्त
विनम्र कोटी कोटी अभिवादन !
समाजसेवक
मा.श्री. अविनाश देडगांवकर
अहिल्यानगर

## फेब इंडियन
हेण्डलूम एण्ड हेण्डीक्राफ्ट
आर्ट & क्राफ्ट एक्झीबीशन
Diwali SPECIAL
आमच्या एक्झीबिशन मध्ये कोणत्याही दुकानातून रु. 1999 पेक्षा जास्त खरेदी करा आणि लकी ड्रॉमध्ये जिंका आकर्षक बक्षिसे
- चंदेरी आणि पटोरा साडी
- बनारसी साडी-ड्रेस मटेरिअल्स
- पंच वर्क • पश्चिम बंगाल साडी
- लखनवी चिकन • कोटा सिल्क
- काश्मीर सूट आणि पश्मिना शाल
- जयपुर बेडशीट्स • राजस्थानी मोजरी
- भदोई कार्पेट • ज्वेलरी • खादी शर्ट

BOOKS • गृह उपयोगी वस्तु
वेळ : स. ११.०० ते रा. १०.०० पर्यंत
पार्किंग व एन्ट्री फ्री
ओपन ग्राउण्ड - पारिजात चौक
तांबटकर मळा, गुलमोहर रोड, अहिल्यानगर

इंडिया FOR THE MEN गारमेंटस्
10% DISCOUNT FESTIVE OFFER
दिवाळी शॉपिंग आता आणखी स्वस्त
ऑफर १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२६ पर्यंत
सर्व itmes वर सरसकट 10% Discount
*इनरवेअर सोडून
तुमच्या आवडीचे फॅशन कलेक्शन आता खास दिवाळी ऑफरसह!
इमारत कंपनी पार्किंग, कोहिनूरच्या मागे, अ.नगर. 7588513820
एम.जी. रोड, कोहिनूर समोर, अ.नगर. 2344449

## भावपूर्ण श्रद्धांजली

भाऊ
मायेची गेली सावली!
करुणेचा हरवला सागर!!
उरली नाही साथ आम्हाला!
आठवण येते क्षणाक्षणाला!!
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली
स्व.भानुदासजी कोतकर
(स्व. दि. २४/१०/२०२६)
दुःखांकित
विनायक लक्ष्मण काळे
राजेंद्र लक्ष्मणराव लोणकर
अहिल्यानगर

आमचे
## आधारवड
स्व.भानुदासजी कोतकर
यांना
भावपूर्ण श्रद्धांजली
: दुःखांकित :
राजेंद्र पेढेवाले, केडगाव देवी
रविंद्र तात्यासाहेब कोतकर । राजेंद्र तात्यासाहेब कोतकर
रमेश तात्यासाहेब कोतकर
प्रतिभा दादासाहेब मांडे । सुरज रविंद्र कोतकर

## अखेरचा जय श्रीराम
जाणता राजा

स्व.भानुदासजी कोतकर साहेब
आपल्या स्मृती आम्हास सदैव प्रेरणादायी भावपूर्ण श्रद्धांजली..!
-✲ शोकाकुल ✲-
प्रतिक (भाऊ) श्रीधर कोतकर
राजवीर (भैय्या) प्रतिक कोतकर
जय बजरंग प्रतिष्ठाण,शिवाजीनगर मित्र मंडळ,केडगाव

# आमचे भाग्यविधाते

# स्व.भानुदासजी कोतकर साहेब

यांना **॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥**

"काळाने घाला घातला
आणि जनतेच्या सेवेसाठी
कायम तत्पर असणारा
नेता आमच्यातून हिरावून नेला.

**- शोकाकुल -**

**अहिल्यानगर महानगरपालिका कर्मचारी वृंद, केडगांव विभाग.**

# ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

''चंदनापरी देह झिजवला,
कष्टातुन वसंत बहरला,
नाही उरली साथ आम्हाला,
आठवण येते क्षणोक्षणाला''



श्री.नागेश (बापू) नामदेव सांगळे यांच्या मातोश्री

## स्व.मंगल नामदेव सांगळे

यांचा **॥ दशक्रिया विधी ॥**

रविवार दि.०१/११/२०२६ रोजी, सकाळी ०८.०० वा.

**※ ठिकाण ※**

श्री.क्षेत्र सिध्दटेक गणपती, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर

**※ शोकाकुल ※**

| | | | |
|---|---|---|---|
| गणेश कवडे | अभय भिसे | सचिन सातपुते | दिंगबर कर्डीले |
| अनुप काळे | संतोष भोसले | मनोज गुंड | सुनिल लोंढे |
| राजु पवार | रमेश बाबर | पप्पु कोतकर | राजु संधू |
| अविनाश शिंदे | संजय काळे | शशी रासकर | अमोल भातपूरे |
| मयुर जगदाळे | अनिकेत येमूल | संकेत वंगार | |